- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २४ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८५ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**

- ✔ २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,५१,३५० /-
- ✔ चांदी : २,४८,३००/-


Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# शेतकऱ्यास अश्रू अनावर झाल्याने मुख्यमंत्रीही भावूक

**वृत्तसंस्था, लातूर**

पावसाने पाठ फिरवल्याने शिवार करपले, सोयाबीन हातातून गेले आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. निलंगा तालुक्यातील जाऊ येथे बुधवारी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा प्रत्यक्ष ऐकून घेतल्या. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन सरसकट मदत करणार आहे, अशी ग्वाही दिली.

दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्याने सोयाबीनसह खरीप पिकांची झालेली दुरवस्था



शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. मुख्यमंत्री स्वतः शेतात उतरले आणि हातात वाळलेली सोयाबीनची पिके घेऊन नुकसानीची पाहणी केली. पिकांची अवस्था पाहून शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाची तीव्रता त्यांनी जाणून घेतली. जाऊ येथील शेतकरी नूर पटेल पिकांच्या नुकसानीची माहिती देताना भावूक झाले.

## पुढच्या दोन दिवसांत दुष्काळसंदर्भात जीआर काढतोय, मुख्यमंत्र्यांची लातूरमध्ये मोठी घोषणा

महिला शेतकरी मंगलबाई कोयते यांनाही आपली व्यथा सांगताना अश्रू अनावर झाले. शेतकऱ्यांच्या या व्यथा ऐकून मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना धीर देत चिंता करू नका, सरकार आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास दिला. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप हंगाम हातातून निसटला असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी शासन आवश्यक कार्यवाही करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खा. ओमराजे निंबाळकर, माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आमदार बसवराज पाटील, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, जिल्हा परिषद अध्यक्षा उषा पाटील यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

शासनाने दुष्काळाची परिस्थिती अतिशय गांभीयार्ने घेतली आहे. मराठवाड्यात, विशेषतः लातूरमध्ये, १९७२ नंतर भीषण दुष्काळी परिस्थीमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी सरकार सरसकट मदत करणार आहोत. येत्या दोन दिवसांत दुष्काळ निवारणासाठी शासन जीआर काढणार असून, रबी पिकांनाही मदत दिली जाईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केली.

लातूर, धाराशीव जिल्ह्यातील पीक-पाणी परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आज (ता.२३) सकाळी लातूर विमानतळावर आगमन झाले. यानंतर त्यांनी औसा व निलंगा या दोन्ही तालुक्यांमध्ये पाहणी केली. औसा तालुक्यातील खरोसा येथे दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांशी संवाद साधत असताना शेतक-यांना तातडीने मदतीचे आश्वासन दिले.

### थोडक्यात

## मीराबाई चानूने रौप्यपदक जिंकत रचला इतिहास



आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये मीराबाई चानूने रौप्यपदक जिंकले आहे. मीराबाईने अंतिम फेरीत एकूण १९८ किलोग्रॅम वजन उचलत रौप्यपदकावर नाव कोरले. मीराबाईला सुवर्णपदक जिंकता आले नसले तरी तिने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कारण भारताला आशियाई क्रीडा स्पर्धेतील वेटलिफ्टिंगमध्ये १९९८ नंतर एकही पदक जिंकता आले नव्हते. विशेष म्हणजे, हे मीराबाई चानूचे वैयक्तिकरित्या पहिलेच आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक आहे.

मीराबाई चानूने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या स्नॅच फेरीत ८७ किलोग्रॅम वजन उचलले. स्नॅचनंतर ती तिसऱ्या स्थानावर होती. उत्तर कोरियाच्या रि सोंग गम हिने ९४ किलोग्रॅम वजन उचलत पहिला क्रमांक मिळवला होता. त्यानंतर क्लीन अँड जर्कमध्येही उत्तर कोरियाच्या खेळाडूने आपले वर्चस्व कायम ठेवत सुवर्णपदकावर कब्जा केला. सामान्यतः क्लीन अँड जर्क हा मीराबाई चानूचा मजबूत भाग मानला जातो. मात्र रि सोंग गमविरुद्ध तिला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. रि सोंग गमने एकूण २१५ किलोग्रॅम, तर मीराबाईने १९८ किलोग्रॅम वजन उचलले. क्लीन अँड जर्कमध्ये उत्तर कोरियाच्या खेळाडूने १२१ किलोग्रॅम वजन उचलले, तर मीराबाईने १११ किलोग्रॅम वजन उचलले.

# महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक रद्द करा!

**वृत्तसंस्था, मुंबई**

निवडणूक आयोगाबाबत इंडियन एक्स्प्रेसने मोठा गौप्यस्फोट केला आहे. निवडणूक आयोगात एकवाक्यता नसल्याचे समोर आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर दोन्ही निवडणूक आयुक्तांनी काही आक्षेप घेतले होते. ही बाब समोर येताच काँग्रेसने आज पत्रकार परिषद घेऊन दिल्ली आणि हरियाणातील विधानसभेच्या झालेल्या निवडणुका रद्द करा, अशी मागणी केली आहे.

उद्धव ठाकरे यांनी सुद्धा आज पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्तांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. देशांतर्गत, पक्षांतर्गत लोकशाही कशी राबवली जाते की नाही हे बघणारा निवडणूक आयुक्त नेमणुकीद्वारे नेमला जातो. त्याची निवडणूक का होत नाही?. मग हा कोणाच्या मर्जीने नेमला जातो? कोण नेमतो याला? मर्जीने याची नेमणूक होत



असेल तर त्यांच्या घरचं पाणी भरणार. तो पाणी भरताना इतकं पाणी भरतोय की त्यात देशाची लोकशाही बुडतेय असे उद्धव ठाकरे म्हणाले.

मी निवडणूक आयोगाला धन्यवाद देतो. सुखबीर संधू आणि विवेक जोशी यांना, तुम्ही धाडस दाखवलं. आता तुमच्या लक्षात येत असेल, म्हणून मी विचारलं, तुम्ही सगळे चॅनलवाले पत्रकार परिषदा दाखवता का? चॅनलने त्या भयातून बाहेर येणं गरजेचं आहे.

आता जनता रस्त्यावर उतरली तर मात्र काही सांगता येत नाही. तुम्ही लोकशाहीचे आधारस्तंभ आहात. लोकशाहीचा होत असलेला हा खून, पक्ष फोडणारी दरोडेखोरांची टोळी याचा पर्दाफाश जनतेसमोर आला पाहिजे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

### निवडणूक आयुक्तांनी भांडं फोडलेलं आहे

मी चॅनलना विचारतोय तुमच्यात एकमत करा. लोकशाही वाचवा. आम्ही लढतच आहोत. आम्ही विरोधी पक्ष जनतेचे प्रतिनिधी आहोत. जनता आता नुसती मन की बात ऐकणार नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले. आपल्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्यावेळी बेकायदेशीर सरकार होते. निवडणूक आयुक्तांनी भांडं फोडलेलं आहे. कसा मनमानी कारभार चालत होता. पश्चिम बंगालमध्ये ९० लाख मतदार वगळले. महाराष्ट्रात ४५ लाख मतदार घुसवले. ४० लाखांवर आक्षेप घेतला होता. मी, राज आम्ही मविआने मोर्चा काढलेला असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरुंगात टाकले पाहिजे

इथल्या निवडणूक आयुक्तांना विचारलं, ते बोलतात आमच्याकडे पॉवर नाही. मग पॉवर कोणाकडे आहे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारलं. म्होरक्या कोण आहे? ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरुंगात टाकलं पाहिजे, मग त्याच्या म्होरक्याला तुरुंगात टाकून या सगळ्या प्रक्रियेचा पुनर्विचार झाला पाहिजे.

महाराष्ट्र, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या निवडणुका रद्द करून इथल्या निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या पाहिजेत. विरोधी पक्षात मतभेद असले तरी बॅलेट पेपरच्या मुद्यावर एकत्र आलं पाहिजे अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

# 'अब की बार ज्ञानेश कुमार'

## सीजेपीच्या टार्गेटवर मुख्य निवडणूक आयुक्त





**वृत्तसंस्था, मुंबई**

नीट पेपरफुटीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेतल्यानंतर आता सीजेपीचे पुढचे टार्गेट ठरलं आहे. अंतर्गत मतभेदांमुळे चर्चेत आलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगामध्ये सुधारणा करा, असं म्हणत सीजेपीचे प्रमुख अभिजीत दिपके हे आता आंदोलनाची वात पेटवण्याच्या तयारीत आहेत. 'ज्ञानेश कुमार आता तुमचे काम तमाम' अशी पोस्ट शेअर करत अभिजीत दिपके यांनी आता मोठे संकेत दिले आहेत. यासंबंधीत २४ सप्टेंबर रोजी अभिजीत दिपके हे पत्रकार परिषद घेणार आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि त्यांचे सहकारी निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू, विवेक जोशी यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. गेल्या १० महिन्यांत दोन्ही आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर तब्बल १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवले आहेत अशी माहिती समोर आली आहे. नवीन मतदारांची नोंदणी, मतदार यादीतून नावं वगळणं आणि ती पुन्हा समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेवर आक्षेप घेतले गेले आहेत. विशेष म्हणजे एसआरएच्या मुद्द्यावरून हे मतभेद झाले आहेत. नव्या मतदार नोंदणीच्या फॉर्म-६ मधल्या प्रश्नांना दोन आयुक्तांचा विरोध असल्याचं समोर आलं आहे. दोन आयुक्तांनी या संदर्भात कॅबिनेटच्या सचिवांकडेही तक्रार केल्याची माहिती समोर आली आहे.

निवडणूक आयोगातील या मतभेदानंतर आता विरोधी पक्षांनीही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका केली आहे. ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्यात यावा, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. राहुल गांधी यांच्यासह ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, तेजस्वी यादव यांच्यासह प्रमुख नेत्यांनी देशभरातील निवडणूक प्रक्रियेमध्ये घोळ झाल्याची टीका करत निवडणुका परत घेण्याची मागणीही केली आहे.

# बारामती, पंढरपूर, दापोली, नागपूर येथे नवीन 'अपर जिल्हाधिकारी' कार्यालये

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय, जिल्हा मुख्यालयाचे अंतर कमी होणार, ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील सर्वसामान्य व ग्रामीण जनतेला महसुली सेवांचा लाभ जलद गतीने मिळावा तसेच प्रशासकीय कामकाजात अधिक गतिमानता यावी, यासाठी महसूल विभागाने प्रशासकीय विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय घेतला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील ४ प्रमुख जिल्ह्यांमध्ये ४ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला.



प्रशासकीय सुविधांचा विस्तार करण्यासाठी आणि कामकाज लोकाभिमुख करण्यासाठी बारामती (पुणे जिल्हा), पंढरपूर (सोलापूर जिल्हा), दापोली (रत्नागिरी जिल्हा), नागपूर - ग्रामीण (नागपूर जिल्हा) या चार ठिकाणी नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे जिल्ह्यांचे मोठे भौगोलिक अंतर आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता, नागरिकांना जिल्हा मुख्यालयात जाण्यासाठी होणारा प्रवास, वेळ व आर्थिक भुर्दंड वाचणार आहे. कामांचा वाढता व्याप कमी होणार असून मुख्य जिल्हाधिकारी कार्यालयांवरील कामाचा ताण कमी होऊन स्थानिक पातळीवरील प्रश्न त्वरित मार्गी लागण्यास मदत होईल. महसुली कायदे, जमीन विषयक बाबी, पुनर्वसन, आणि इतर तातडीच्या प्रशासकीय निर्णयांना या नवीन कार्यालयांमुळे मोठी गती मिळणार आहे.

"राज्यातील तळागाळातील, ग्रामीण व दूरवरच्या भागातील सर्वसामान्य नागरिकांना महसुली सेवांचा लाभ अत्यंत सुलभ आणि गतिमान पद्धतीने मिळावा, यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे. या नवीन कार्यालयांमुळे सामान्य जनतेचा वेळ आणि पैसा वाचेल तसेच प्रशासकीय कामांना मोठी गती मिळेल," असे महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

# दुर्गम भागातील नागरिकांच्या दारात महसुली सेवा

## नागपुरात ९ तर गडचिरोलीत ६ नवीन अपर तहसीलदार कार्यालये, नागपूर (ग्रामीण) येथे नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मोठा निर्णय

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

सर्वसामान्य व ग्रामीण जनतेला शासकीय सुविधा सहज मिळाव्यात आणि प्रशासकीय कामे जलद गतीने व्हावीत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक महत्त्वपूर्ण व धाडसी निर्णय घेतला आहे. या निर्णयांतर्गत नागपूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करत १ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि १५ नवीन अपर तहसीलदार कार्यालये सुरू करण्यात येत आहेत. या निर्णयामुळे स्थानिक शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांना साध्या कामांसाठी दूरवरच्या तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात जावे लागणार नाही.

नागपूर जिल्ह्यात अपर जिल्हाधिकारी कार्यालयासह ९ अपर तहसीलदार कार्यालये नागपूर जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण आणि प्रशासकीय कामकाजाचा वाढता व्याप विचारात घेऊन नागपूर (ग्रामीण) येथे नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. यासोबतच जिल्ह्यातील विविध तालुक्यांत ९ नवीन अपर तहसीलदार कार्यालये सुरू केली जात आहेत.

### ९ नवीन अपर तहसीलदार कार्यालय

- नागपूर (ग्रामीण) : बुटीबोरी
- हिंगणा : हुडकेश्वर
- नागपूर (शहर) : वानाडोंगरी
- कामठी : पारडी
- काटोल : वडोदा
- नरखेड : कोंढाळी आणि जलालखेडा
- मौदा : कोदामेंढी
- कुही : वेलतूर

### अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागाला मोठा दिलासा

गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागातील जनतेला शासकीय सेवा जलद गतीने मिळण्यासाठी जिल्ह्यातील ६ तालुक्यांमध्ये ६ नवीन अपर तहसीलदार कार्यालये स्थापन करण्यात येत आहेत.

- कुरखेडा : मालेवाडा
- आरमोरी : वैरागड
- धानोरा : पेंढरी
- सिरोंचा : आसरअल्ली
- एटापल्ली : कसनसूर
- अहेरी : जिमलगट्टा

या कार्यालयांमुळे नागरिकांना जमिनीचे फेरफार, विविध दाखले, संजय गांधी निराधार योजना आणि इतर महसुली सेवा त्वरित मिळतील. सुरुवातीला ही कार्यालये तात्पुरत्या इमारतींमध्ये सुरू केली जाणार असून, कायमस्वरूपी बांधकामाचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

"नागपूर व गडचिरोली जिल्ह्यातील तळागाळातील, ग्रामीण व अतिदुर्गम भागातील नागरिकांना महसुली सेवांचा लाभ सहज व जलद मिळावा यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे. या नवीन कार्यालयांमुळे जनतेचा वेळ आणि प्रवासखर्च वाचेल तसेच प्रशासकीय कामांना मोठी गती मिळेल."

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र**

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : गुरूवार, २४ सप्टेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

# दुष्काळ आढाव्याचे टप्पे

पावसाने पाठ फिरवल्याने बळिराजा संकटात सापडला असताना आता राज्य सरकारने वेगाने पावले उचलण्यास सुरुवात केली असून तीन टप्प्यांच्या आढाव्याद्वारे परिस्थितीचे मूल्यांकन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने दुष्काळ जाहीर करण्यासाठी सुधारित कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यामुळे केवळ पाऊस कमी पडला म्हणून दुष्काळ जाहीर न करता प्रत्यक्ष परिस्थितीचे मूल्यांकन केले जाणार आहे आणि ५ ऑक्टोबरनंतर पंचनामे केले जाणार आहेत. दरम्यान, राज्यात 'दुष्काळ निवारण' आणि मदत उपाययोजनांना आधीच सुरुवात करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सोमवारी सांगितले. दुष्काळाची औपचारिक घोषणा करणे आणि प्रत्यक्षात मदतकार्य सुरू करणे यातील फरक स्पष्ट करताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, एनडीआरएफ निकषांनुसार केंद्राकडे मदत मागण्यापूर्वी ठराविक टप्पे पूर्ण करणे आवश्यक असते. मात्र, पावसाच्या अभावामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारच्या निधीची वाट पाहणार नाही.

नियमानुसार ५ ऑक्टोबरनंतर पिकांच्या नुकसानीचे औपचारिक मूल्यांकन (पंचनामे) केले जाईल आणि त्यानंतर राज्य सरकार केंद्राकडे औपचारिक मदत मागेल. यंदा पावसाने दडी मारल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने रोड मॅप तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्जन्यमानासह पीकनुकसान, पाणीसाठा, भूजलपातळी, चाऱ्याची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याची स्थिती तपासल्यानंतर दुष्काळग्रस्त गावांबाबत निर्णय घेतला जाणार आहे. मागील वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या १ कोटी ५४ लाख शेतकऱ्यांच्या थेट खात्यात २१ हजार ५४३ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली होती. त्याच धर्तीवर यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास बाधित शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने आधीच तयारी सुरू केली आहे. नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, खरीप हंगामात बाधित झालेल्या गावातील शेतकरी मदतीपासून वंचित राहू नयेत, अशा स्पष्ट सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. आगामी काळात पाऊस, पीक नुकसान आणि पाणी उपलब्धतेच्या अहवालानंतर राज्यातील कोणत्या भागात दुष्काळ जाहीर करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

सुधारित दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार मूल्यांकनाची ३ टप्प्यांची प्रक्रिया केली जाणार आहे. यात पावसाशी संबंधित अनिवार्य मानकांची तपासणी, वनस्पती निर्देशांक, पेरणीचे क्षेत्र, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यासारख्या निर्देशांकाच्या आधारे दुष्काळाची तीव्रता ठरवली जाते. ज्या गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणीत ३३ टक्क्यांपेक्षा जास्त पिकांचे नुकसान आढळेल ती गावे दुष्काळ घोषणेसाठी पात्र ठरतात. कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय दुष्काळ निरीक्षण समितीच्या अंतिम अहवालानंतर सरकार दुष्काळाबाबत अंतिम निर्णय घेईल. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्यात तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असताना मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दुष्काळाबाबत ऑक्टोबर महिन्यात निर्णय होणार असल्याचे सोमवारी स्पष्ट केले. त्यामुळे विरोधकांच्या मागणीनुसार लगेच दुष्काळ घोषित होण्याची शक्यता नाही.

कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे, शिवाय विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या पार्श्वभूमीवर प्रचलित निकष बाजूला ठेवून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे. कर्नाटकने विशेष सत्रात तीन दिवस चर्चा घडवून आणत त्यादृष्टीने कामही सुरू केले आहे. महाराष्ट्र सरकारनेही याबाबत तातडीने निर्णय घेऊन दुष्काळावर चर्चा आणि उपाययोजना करण्यासाठी एक आठवड्याचे विशेष अधिवेशन बोलवायला हवे अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांनी केली आहे. दुष्कळसदृश परिस्थितीमुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हेक्टरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत आणि पूर्ण कर्जमाफी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. उभी पिके डोळ्यांदेखत जळून खाक होत असताना सरकार मात्र बैठकांचा खेळ मांडून मदत देण्यास टाळाटाळ करत आहे असा आरोप त्यांनी केला.

# वैद्यकीय क्षेत्रातील लूट थांबायला हवी !

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

कधी कोरोना काळात देवदूत बनून धावलेले डॉक्टर्स गरीब रुग्णांचा खिसा कसे कापतात यावर सध्या समाज माध्यमांत बरीच चर्चा रंगलेली आहे. अन्न आणि औषध प्रशासन विभागाची सूत्रे हातात घेतल्यानंतर निर्भीड आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांनी आता आपला मोर्चा मोठमोठ्या रुग्णालयांकडे आणि औषधी क्षेत्राकडे वळवला आणि त्यामुळे बऱ्याच खाजगी डॉक्टरांचे आणि औषधांचा काळा बाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

एखाद्या माणसाला साधा ताप जरी आला तरी कित्येक चाचण्या करून पिळून काढणारे खाजगी डॉक्टर्स ( डॉ कोल्हे, डॉ बंग दाम्पत्यांसारखे अन्य काही अपवाद वगळता) औषधांच्या तसेच वैद्यकीय उपकरणांच्या माध्यमातून रुग्णांना कसे लुटतात आणि आपल्या साध्या क्लिनिकचे पुढे मोठ मोठ्या नर्सिंग होममध्ये कसे रूपांतर करतात याचा पाढाच मागच्या आठवड्यात वृत्तपत्रांनी वाचला. एखाद्या रोगाने माणसाची दैना होणार नाही तितकी चिंता या लूटमारीने माणसाची वाढवलेली आहे. त्यामुळे दवाखान्याची पायरी चढतांना नसलेल्या व्याधी सुद्धा पायरी उतरतांना माणसाला छळू लागतील, याचा नेम नाही. नुकतेच अन्न आणि औषध प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणानुसार खाजगी रुग्णालयांत सर्जिकल साहित्य आणि मेडिकल उपकरणांवर तब्बल २, ८४१ टक्क्यांपर्यंत अवाजवी नफा उकळला जात असल्याचे म्हटल्या गेले आहे.

वैद्यकीय क्षेत्रात एखाद्या आय व्ही सेट साठी रुग्णांच्या बिलातून ३२५ रुपये वसूल केल्या जात असले तरी वास्तविक त्याची किंमत फक्त ११.०५ इतकीच आहे, हे ऐकून तर आश्चर्याचा धक्काच बसला. वास्तविक एखादा रुग्ण डॉक्टरकडे प्रकृती सुधारेल या आशेने जातो. तो रुग्ण असतो, एखाद्या किराणा दुकानात गेलेला ग्राहक नसतो. मात्र, ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांत रुग्ण देवाचे रूप पाहतात तेच जर छुप्या पद्धतीने रुग्णांचा गळा कापत असेल तर एखादा कसाई आणि त्यांच्यात साम्य ते काय? साध्या १० मिलिलीटरच्या सिरिंजची किंमत ६.७५ रुपये असतांना वैद्यकीय क्षेत्रात ती ५७.२० रुपये एमआरपी किंमतीत रुग्णांच्या माथी मारली जात आहे.

साध्या सिरिंजच्या किंमतीतच किती मोठी तफावत असल्याचे उघडकीस आले आहे. तिथे अन्य महागड्या उपकरणांत किती मोठी कमाई हे लोकं करत असावेत? एकतर एखाद्या रुग्णालयात भरती होत नाही तोच चेक अप केल्यानंतर डॉक्टर भली मोठी औषधांची यादीच रुग्णांच्या नातेवाईकांच्या हातात सोपवतात. त्यातल्या त्यात आजकाल मोठ मोठ्या रुग्णालयांत त्यांचे स्वतःचेच औषधी दुकानं असतात. त्यामुळे काय घोळ होत असावा, तेच जाणे. बरं, सरकारने गोरगरिबांना महागड्या शस्त्रक्रिया तसेच अन्य उपचार अत्यल्प दरात किंवा विनामूल्य करता यावेत म्हणून काही खाजगी रुग्णालयांना मान्यता दिली आहे. काही योजना त्यातून राबविल्या जातात. रुग्णांवर होणारा खर्च असे खाजगी दवाखाने



सरकारकडून, विमा कंपन्यांकडून घेतात. मात्र, त्यातही काही घोळ होत नसावा असे ठामपणे कुणी सांगू शकणार नाही. मृत रुग्णाला जिवंत दाखवून सरकारकडून किंवा नातेवाईकांकडून पैसे लुटणाऱ्या रुग्णालयांचे कारनामे अधून मधून उघडकीस येतच राहतात.

देशात २३ सप्टेंबर २०१८ मध्ये आयुष्यमान भारत या गोरगरिबांसाठी असलेल्या वैद्यकीय योजनेचा प्रारंभ झाला होता. तेव्हापासून मार्च २०२१ पर्यंतच्या कामगिरीचे कॅगने ऑडिट केले होते. त्यात तब्बल ७.५ लाख लाभार्थींची नोंद ९९९९९९९९९९ या एकाच मोबाईल नंबरनुसार करण्यात आली होती. यावरून वैद्यकीय क्षेत्रात सरकारची आणि पयार्याने जनतेची किती मोठ्या प्रमाणात लूट सुरू असावी याचा अंदाज यायला लागतो. त्यानंतर कुठले ऑडिट झाले की नाही हे कळायला मार्ग नाही. मात्र, ज्या खाजगी रुग्णालयांत अशा सरकारी योजना राबविण्यात येत असतात, त्यांच्या कामगिरीचे निःस्वार्थ अधिकाऱ्यांकडून ऑडिट केल्यास नक्कीच नवा घोळ उघडकीस येऊ शकतो आणि सध्या अन्न आणि औषध प्रशासनाला मुंढे सारखे कर्तव्यदक्ष अधिकारी लाभल्याने ही गोष्ट नक्कीच राबविल्या जाऊ शकते.

औषधी निर्माण कंपन्या जर औषधी दुकानदारांना या औषधी कमी दरात देत असतील तर त्यावर अव्वाच्या सव्वा किंमती छापतातच कशाला? यात त्यांचा काय फायदा? आता यामुळे त्यांच्या औषधींचा किंवा वैद्यकीय उपकरणांच्या खप वाढतही असेल तर यात सामान्य जनतेला लुटण्याचे पातक मात्र औषधी निर्माण कंपन्यांच्या माथीच बसते. एमआरपीचा हा घोळ निव्वळ वैद्यकीय क्षेत्रापुरताच मर्यादित नाही तर मानवी आयुष्याला लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींत हा घोळ दिसून येतो. निर्माण करणाऱ्या कंपन्यांना जर उत्पादित माल कमी किंमतीत परवडत असेल तर अशा न परवडणाऱ्या एमआरपी छापतातच कशाला? फक्त विक्रेत्यांना फायदा मिळावा म्हणून! दिवसेंदिवस नवनव्या रोगांचा उद्गम होत असतांना त्यावरील खर्च गरीब सामान्य रुग्णांना परवडणारा नसतो. अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांशिवाय आता औषधी ही सर्व स्तरातील लोकांची गरज बनली आहे. तेव्हा अशा रुग्णांची वैद्यकीय क्षेत्रातील लोकांकडून होणारी ही लूट थांबायला हवी.

– ८४१२८७७२२०

# ॲट्रॉसिटी कायद्याला आव्हान: कायदेशीर पेच की सामाजिक संघर्ष?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारताच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये नुकतीच एक अत्यंत महत्त्वाची आणि देशाच्या सामाजिक तसेच कायदेशीर वर्तुळात खळबळ उडवून देणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेद्वारे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या काही कठोर तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला थेट आव्हान देण्यात आले आहे. देशातील उपेक्षित आणि मागास वर्गाला सामाजिक न्याय मिळावा आणि त्यांच्यावरील अत्याचारांना आळा बसावा, या मूळ आणि अत्यंत उदात्त हेतूने संसदेने या कायद्याची निर्मिती केली होती.

मात्र, गेल्या काही वर्षांत या कायद्याला मिळालेली कायदेशीर आव्हाने आणि त्यावरून निर्माण झालेले वाद हे केवळ कायदेशीर पेच नसून तो एक गडद सामाजिक संघर्ष बनला आहे. सद्यस्थितीत या कायद्याची अंमलबजावणी आणि त्याचे समाजात उमटणारे प्रत्यक्ष पडसाद पाहता, कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे अत्यंत परखड आणि अभ्यासपूर्ण निरीक्षण या याचिकेत नोंदवण्यात आले आहे. ही याचिका केवळ कायद्याच्या कलमांना आव्हान देत नाही, तर संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या रक्षणाचा मोठा प्रश्न उपस्थित करते.

याचिकाकर्त्यांची बाजू प्रभावीपणे मांडताना सर्वोच्च न्यायालयातील वकील विष्णू जैन यांनी अनेक गंभीर आणि विचार करायला लावणारे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, या कायद्यातील काही विशिष्ट कलमे आणि तरतुदी या भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला बहाल केलेल्या समानतेच्या अधिकाराच्या तसेच व्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या थेट विरोधात जाणाऱ्या आहेत. या कायद्यांतर्गत एखाद्या व्यक्तीवर केवळ तक्रारीच्या आधारावर, कोणतीही ठोस प्राथमिक चौकशी न करता तत्काळ गुन्हा दाखल केला जातो. सर्वात गंभीर बाब म्हणजे, या कायद्यांतर्गत अटकपूर्व जामीन मिळण्याची तरतूद नसल्याने आरोपीला जामीन मिळणे अत्यंत कठीण होऊन बसते. यामुळे अनेक निष्पाप नागरिकांच्या मूलभूत मानवाधिकारांचे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे उघडपणे हनन होते. संविधानातील कलम चौदा अन्वये मिळणारा समानतेचा अधिकार आणि कलम एकवीस अन्वये मिळणारा सन्मानाने जगण्याचा अधिकार या कायद्याच्या एकतर्फी आणि अत्यंत कठोर प्रक्रियेमुळे धोक्यात आल्याचा दावा न्यायालयात करण्यात आला आहे.

न्यायालयासमोर मांडलेला सर्वात कळीचा आणि चिंताजनक मुद्दा म्हणजे या कायद्याचा सातत्याने वाढणारा गैरवापर होय. आजकाल वैयक्तिक राग काढण्यासाठी, जुने जमिनीचे किंवा पैशांचे वाद मिटवण्यासाठी, राजकीय किंवा व्यावसायिक स्पर्धेतून एखाद्याला जाणीवपूर्वक अडकवण्यासाठी किंवा केवळ आर्थिक लाभासाठी या कायद्याचा एका अमोघ आणि विध्वंसक शस्त्रासारखा वापर केला जात असल्याची अनेक उदाहरणे देशभरातून सातत्याने समोर येत आहेत. यामुळे दोन समाजांमध्ये सलोखा आणि सौहार्द निर्माण होण्याऐवजी तेढ आणि अविश्वासाची दरी अधिक रुंदावत चालली आहे. कायद्याचा धाक राहण्याऐवजी त्याची भीती निर्माण झाली असून, अनेकदा खऱ्या पीडितांऐवजी खोटे तक्रारदारच या कायद्याचा गैरफायदा घेताना दिसत आहेत, याकडे याचिकेत लक्ष वेधण्यात आले आहे.

या कायद्याच्या अंमलबजावणीचे सांख्यिकीय आणि कायदेशीर विश्लेषण केल्यास एक अत्यंत विदारक सत्य समोर येते. या कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या एकूण गुन्ह्यांपैकी न्यायालयात प्रत्यक्ष दोषसिद्धी होण्याचे म्हणजेच आरोपींना शिक्षा मिळण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. न्यायव्यवस्थेतील प्रदीर्घ प्रक्रियेनंतर बहुतांश प्रकरणे पुराव्याअभावी किंवा मुळातच खोटी आणि बनावट असल्याकारणाने फेटाळून लावली जातात. मात्र, कायद्यातील विशेष तरतुदींनुसार, गुन्हा दाखल झाल्यानंतर लगेचच तक्रारदार व्यक्तीला तत्काळ सरकारी मदतीच्या स्वरूपात मोठी आर्थिक नुकसानभरपाई दिली जाते. दोषसिद्धीचा दर अत्यंत कमी असूनही, केवळ प्राथमिक माहिती अहवाल दाखल झाल्याच्या आधारावर आतापर्यंत देशभरात हजारो खोट्या आणि बनावट प्रकरणांमध्ये कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाई वाटली गेली आहे.

खोट्या तक्रारी करणाऱ्यांनी सरकारी पैशांची मोठी उचल केली असून, हा थेट सामान्य आणि प्रामाणिक करदात्यांच्या पैशांचा आणि सरकारी तिजोरीचा प्रचंड मोठा अपव्यय आहे. एकीकडे निष्पाप लोकांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवून त्यांना नाहक कायदेशीर, आर्थिक व मानसिक त्रासाच्या खाईत लोटले जाते आणि त्यांचे संपूर्ण सामाजिक जीवन उद्ध्वस्त केले जाते, तर दुसरीकडे अशा खोट्या तक्रारदारांना सरकारी यंत्रणेकडूनच आर्थिक बळ मिळते, हा अत्यंत गंभीर आणि धक्कादायक विरोधाभास या याचिकेद्वारे उघड करण्यात आला आहे. त्यामुळेच, खोट्या तक्रारींना प्रभावीपणे आळा घालण्यासाठी, अटकेपूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत प्राथमिक चौकशीची सक्ती करण्यासाठी, खोट्या ठरलेल्या प्रकरणांमधून दिलेली नुकसानभरपाई सव्याज वसूल करण्यासाठी आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वाचे खऱ्या अर्थाने रक्षण करण्यासाठी या कायद्यामध्ये न्याय्य, समतोल आणि कालसुसंगत बदल करणे ही आता तातडीची गरज बनली आहे. सर्वोच्च न्यायालय आता या गंभीर सांख्यिकीय आणि घटनात्मक प्रश्नांची कशा प्रकारे दखल घेते आणि निष्पापांचे रक्षण करण्यासाठी कायदेमंडळाला कोणते निर्देश देते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

अँट्रॉसिटी कायद्याभोवती निर्माण झालेली परिस्थिती हा कायदेशीर पेच आणि सामाजिक संघर्ष या दोन्हीचा मिलाफ आहे. कायद्याचा दुरुपयोग रोखणे जितके गरजेचे आहे, तितकेच दलित आणि आदिवासी बांधवांना सुरक्षित वातावरण देणेही महत्त्वाचे आहे. केवळ कायदे कडक करून किंवा ते शिथिल करून हा प्रश्न सुटणार नाही, तर समाजात जातीय सलोखा आणि संवेदनशीलता वाढवणे हाच यावरचा खरा उपाय आहे.

– ९५६१५९४३०६

# जपान विरुद्धच्या खराब प्रदर्शनाने टिम इंडियाच्या मनोबलावर परिणाम होईल?

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या मैदानावर भारत आणि जपान असा सामना कागदावर अत्यंत एकतर्फी वाटू शकतो, पण मैदानावर निर्माण झालेली चुरस किंवा अनपेक्षित अडखळणे क्रिकेट अनिश्चिततेचा खेळ का आहे, याची पुन्हा एकदा प्रचिती आली. भारतासारख्या जागतिक क्रिकेट महासत्तेच्या संघासमोर जपानसारख्या नवख्या आणि सहयोगी देशाने उभे केलेले आव्हान क्रीडा विश्वात भुवया उंचावणारे ठरले आहे. भारत भले दोन धावांनी जिंकला असला तरी तो भारताचा त नैतिक पराभवच म्हणावा लागेल. कारण जपान सारख्या संघा विरुद्ध एकतर्फी आक्रमणाची अपेक्षा होती.

**जपानी संघाची शिस्त आणि अनपेक्षित प्रतिकार**

जपानच्या क्रिकेट इतिहासाची पाळेमुळे नुकतीच रुजू लागली असली, तरी त्यांच्या खेळात दिसलेली शिस्त व्यावसायिक संघाला साजेशी होती.

कणखर गोलंदाजी व अचूक टप्पाः जपानी गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांना मोकळेपणाने फटकेबाजी करू न देता नियंत्रित टप्प्यावर मारा केला.

चपळ क्षेत्ररक्षणः जपानच्या खेळाडूंनी मैदानावर दाखवलेला उत्साह, झेल घेण्याच्या संधी आणि उत्कृष्ट मैदानी क्षेत्ररक्षण अडवलेले चौकार यामुळे भारतावर दबाव वाढला.

लढाऊ वृत्तीः बलाढ्य भारतासमोर शरणागती पत्करण्याऐवजी शेवटच्या चेंडूपर्यंत झुंज देण्याची जपानची मानसिकता त्यांच्या रणनीतीचा गाभा ठरली.

भारतीय संघ का अडखळला?

जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि प्रचंड स्पर्धात्मक अनुभव पाठीशी असतानाही भारतीय फलंदाजी किंवा गोलंदाजी जपानसमोर अडखळण्यामागे खालील कारणे प्रामुख्याने दिसून येतातः

अतिआत्मविश्वास आणि परिस्थितीचा अंदाज न येणेः नवख्या संघाला कमी लेखण्याची चूक भारतीय खेळाडूंच्या फटक्यांच्या निवडीत स्पष्टपणे दिसली. खेळपट्टीचा रोख समजून घेण्याआधीच मोठे फटके खेळण्याचा मोह नडला.

फिरकी व संथ माऱ्याविरुद्ध गोंधळः जपानच्या फिरकी गोलंदाजांच्या अनपेक्षित शैलीचा अंदाज न आल्याने लागोपाठच्या षटकात विकेट्स पडल्या व अपेक्षित धावा फलकावर लागल्या नाहीत.

भागीदाऱ्यांचा अभावः दबावाच्या क्षणी संयमाने एक-दोन धावा काढून डाव सावरण्याऐवजी भारतीय फलंदाज भांबावलेले दिसले. खेळपट्टीने आपले रंग दाखवताच भारतीय फलंदाजांचे अवसानच गळाले. एरव्ही पाच षटकात ७०-८० धावा करणारे भारतीय फलंदाज येथे निष्प्रभ ठरले.

**भविष्यासाठी आत्मपरीक्षणाची वेळ**

क्रिकेट आता केवळ मोजक्या पारंपरिक देशांपुरते मर्यादित राहिलेले नाही; सहयोगी देशही अत्याधुनिक प्रशिक्षण आणि रणनीतीसह मैदानात उतरत आहेत. भारतासारख्या क्रिकेट संस्कृती असलेल्या देशासाठी जपानविरुद्धचे हे अडखळणे एक स्पष्ट इशारा आहे. प्रतिस्पर्धी कोणीही असो, सामन्यातील प्रत्येक सत्राचा आदर राखणे आणि मूलभूत तंत्रावर टिकून राहणे किती आवश्यक आहे, हे या सामन्याने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

भारताच्या महिला संघाने आशियाई खेळांमधील क्रिकेट स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकून आपली छाप पाडली. आता आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष संघाची सुवर्णपदक राखण्याची पाळी आहे. महिला संघाप्रमाणेच, भारताचा पुरुष संघही खूप मजबूत असून सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार आहे. भारतीय संघ उपांत्यपूर्व फेरीत आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. चला जाणून घेऊया, आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट स्पर्धा कधी सुरू होईल, कोणते संघ सहभागी होतील आणि तिचे स्वरूप काय असेल.

**एशियन गेम्समध्ये टिम इंडियावर दबाव?**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबर रोजी सुरू होईल. यजमान जपानचा सामना पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानशी होईल. आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश होण्याची ही चौथी वेळ आहे. भारताने शेवटचे सुवर्णपदक हांगझू आशियाई क्रीडा स्पर्धेत जिंकले होते आणि आता सलग दुसऱ्या सुवर्णपदकासाठी त्यांचे लक्ष्य असेल.

**सामने कोणत्या स्वरूपात खेळले जातील?**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेटचे सामने, महिलांप्रमाणेच, टी-२० स्वरूपात खेळले जातील. सर्वात कमी मानांकन असलेल्या सहा संघांना दोन-दोन संघांच्या गटांमध्ये विभागण्यात आले आहे. तीन संघांच्या प्रत्येक गटातील सर्व संघ एकमेकांशी एकदा खेळतील. हे सामने २४ ते २६ सप्टेंबर दरम्यान खेळले जातील. त्यानंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील. उर्वरित चार पूर्ण सदस्य राष्ट्रांना त्यांच्या आयसीसी मानांकनाच्या आधारावर थेट प्रवेश देण्यात आला आहे. २८ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या बाद फेरीच्या सामन्यांमध्ये, गट फेरीतून पुढे आलेल्या चार संघांशी त्यांचा सामना होईल. त्यानंतर उपांत्य फेरी, अंतिम सामना आणि कांस्यपदकासाठीचा सामना खेळला जाईल. अंतिम सामना आणि तिसऱ्या स्थानासाठीचा सामना ३ ऑक्टोबर रोजी खेळला जाईल.

**वैभव आणि बुमराह चर्चेत**

भारताचे वैभव सूर्यवंशी आणि जसप्रीत बुमराह हे या स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण असतील. तथापि, अंतिम संघात वैभवच्या समावेशाबद्दल अनिश्चितता आहे, कारण भारताने आतापर्यंत अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांना संधी दिली आहे. बांगलादेशचे कर्णधारपद लिटन दास भूषवेल, तर साईम अयुबच्या पाकिस्तानमधील पुनरागमनावरही चर्चा सुरू आहे. दरम्यान, नेपाळचा अनुभवी लेग-स्पिनर संदीप लामिछाने आपल्या संघाच्या गोलंदाजीचे नेतृत्व करेल. यजमान जपानचा कर्णधार केंडेल काडोवाकी-फ्लेमिंग, देखील चर्चेत असेल.

**भारत विजेतेपदाचा दावेदार का आहे?**

भारताने मागील दोन टी-२० विश्वचषक जिंकले आहेत आणि आशियाई खेळांसाठी जपानला आपला जवळपास पहिला पसंतीचा संघ पाठवला आहे. त्याच काळात वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका नियोजित असूनही हे घडले आहे. आपला पहिला पसंतीचा संघ पाठवणारा बांगलादेश हा एकमेव पूर्ण सदस्य देश आहे. आयसीसी संघ क्रमवारीत ते आठव्या क्रमांकावर आहेत. परिणामी, भारताला या स्पर्धेसाठी एक प्रबळ दावेदार मानले जाते. या मोहिमेसाठी व्हीव्हीएस लक्ष्मण यांची अंतरिम मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**भारत-पाकिस्तान सामना होण्याची शक्यता किती आहे?**

हे अद्याप निश्चित झालेले नाही, परंतु याची दाट शक्यता आहे. जर दोन्ही संघांनी आपापले उपांत्यपूर्व फेरीचे सामने जिंकले, तर १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ते एकमेकांसमोर येऊ शकतात.

**आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटची सुरुवात कधी झाली?**

आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष आणि महिला क्रिकेट पहिल्यांदा २०१० साली खेळले गेले. त्या वर्षी, बांगलादेशने अंतिम सामन्यात अफगाणिस्तानला पाच गडी राखून हरवून सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर २०१४ मध्ये क्रिकेट पुन्हा सुरू करण्यात आले, ज्यात श्रीलंका विजयी ठरला. २०२२ च्या आवृत्तीसाठी क्रिकेटचे पुनरागमन झाले.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# महावितरणच्या नाट्य स्पर्धेने नागपुरात रंगणार दोन दिवसीय कलामहोत्सव !

## प्रकाशदात्यांची रंगमंचावर भरारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अहोरात्र अविरत सेवा देत सर्वसामान्यांचे जनजीवन उजळवणारे महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी आता आपल्यातील अभिनयाची ऊर्जा रंगमंचावर सादर करण्यासाठी पूर्णपणे सज्ज झाले आहेत. नागपूरकरांसाठी ही एक विशेष आनंददायी कलापर्वणी ठरणार असून महावितरणच्या नागपूर परिमंडलाच्या यजमानपदाखाली प्रादेशिक स्तरावरील आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा येत्या २८ आणि २९ सप्टेंबर २०२६ रोजी सिव्हिल लाईन्स येथील देशपांडे सभागृहात पार पडणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या नाट्य महोत्सवात नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चारही परिमंडलांचे दर्जेदार नाट्यसंघ आपले कलाकौशल्य सादर करणार आहेत.

दैनंदिन ताणतणाव आणि कर्तव्याच्या पलीकडे जाऊन कर्मचाऱ्यांच्या सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षीच्या स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन सोमवार, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय ओंढेकर यांच्या हस्ते होणार असून, यावेळी संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि संचालक (वित्त) अनुदिप दिघे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महोत्सवाचा सांगता व पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता महावितरणचे संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांच्या शुभहस्ते संपन्न होईल.

याप्रसंगी कार्यकारी संचालक (नियोजन व ई-वाहन चार्जिंग स्टेशन्स) प्रसाद रेशमे आणि कार्यकारी संचालक (मानव संसाधन) परेश भागवत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या संपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक असणार असून अमरावती, चंद्रपूर, अकोला व गोंदिया परिमंडलांचे मुख्य अभियंता अनुक्रमे दिलीप दोडके, हरिष गजबे, दत्तात्रय बनसोडे आणि मिलींद दिग्रसकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

या दोन दिवसीय नाट्योत्सवात प्रेक्षकांना वैविध्यपूर्ण आणि दजेर्दार नाटकांची मेजवानी अनुभवता येणार आहे. सोमवारी, २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अकोला परिमंडलातर्फे हेमंत मानकर लिखित 'चिंधी बाजार' हे नाटक सादर होईल, तर दुपारी ३ वाजता अमरावती परिमंडलाचा संघ शंकर नवरे लिखित प्रसिद्ध 'गुलाम' या नाटकाचा प्रयोग सादर करेल. दुसऱ्या दिवशी, मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता यजमान नागपूर परिमंडल सलीम शेख लिखित 'थलाई कुथल' हे नाटक मंचावर आणेल, तर दुपारी ३ वाजता चंद्रपूर परिमंडलातर्फे प्रकाश गडादे लिखित 'एक होती राणी' या नाटकाचा प्रयोग रंगणार आहे.

अभिनय, संवादफेक, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य आणि दिग्दर्शन अशा सर्वच आघाड्यांवर ही प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धा अत्यंत चुरशीची आणि रंजक ठरणार आहे. सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या नागपूरकर रसिकांसाठी ही एक उत्कृष्ट आणि अविस्मरणीय नाट्य मेजवानी ठरेल यात शंका नाही. महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता व या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष राजेश नाईक यांनी सर्व नाट्यप्रेमी आणि सुजाण रसिकांना या मोफत व दर्जेदार नाट्यप्रयोगांचा मनमुराद आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आपुलकीचे आणि आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

## सालेकसा येथे भव्य महाप्रसादाला १२०० भाविकांची उपस्थिती

### शांत व भक्तिमय वातावरणात उद्या बाप्पाला निरोप, डीजेऐवजी भजन मंडळाच्या साथीने विसर्जन



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, नगर पंचायतजवळ, बाजार चौक सालेकसा यांच्या वतीने यंदा तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसादीचा कार्यक्रम बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता सुरू होऊन रात्री १०.३० वाजेपर्यंत उत्साहात पार पडला. या महाप्रसादीचा तब्बल १ हजार ते १२०० भाविकांनी लाभ घेतला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळाच्या वतीने दरवर्षी भक्तांसाठी महाप्रसादीचे आयोजन करण्यात येते. यंदाही भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादीचा लाभ घेतला. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात येणार आहे. यावेळी मंडळाने डीजेचा वापर न करता शांत व शिस्तबद्ध वातावरणात भजन मंडळाच्या साथीने भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप देण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमातून पर्यावरणपूरक, शांततामय व संस्कारक्षम गणेश विसर्जनाचा संदेश देण्यात येणार आहे.

महाप्रसादी कार्यक्रमास शालिनी ताई डॉ. राजेंद्र बडोले, पोलीस निरीक्षक रवि नागोसे, नगर पंचायत सालेकसाचे नगराध्यक्ष विजय फुंडे, मंडळाचे अध्यक्ष राजु फुंडे, राकेश रोकडे, आशु असाटी, कैलास अग्रवाल, विनय शर्मा, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र गवई, राजु रोकडे, अशोककुमार कटरे, देवेंद्र कटरे, गुलाब हत्तीमारे, महेंद्र पटले, राजु वरहाडे, आकाश श्रीवास्तव, निक्की श्रीवास्तव, विवेक नागपुरे, राजेंद्र चावके, भूमेश्वर एकुलकर, विद्याकुमार बहेकार, रामदास चुटे, दिलीप तिवारी, अजय क्षिरसागर, दिनेश असाटी, युगल कटरे, नूरसिंह हरिनखेड़े, हेमेंद्र बघेले, राजेंद्र बागडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडळाच्यावतीने गणेशोत्सव काळात राबविण्यात येणाऱ्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सालेकसा शहरातील नागरिक व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, उद्याच्या विसर्जन सोहळ्यातही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नागपूरच्या 'आपली बस'ची विक्रमी झेप

### दैनंदिन प्रवासी संख्या २.३७ लाखांवर, ४० टक्क्यांहून अधिक डिजिटल तिकीट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** शहर बस सेवेतील डिजिटल तिकीट प्रणालीत नागपूर महाराष्ट्रातील आघाडीचे शहर, तर देशातील अग्रगण्य शहरांपैकी एक म्हणून पुढे आले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या 'आपली बस' सेवेची दैनंदिन प्रवासी संख्या सुमारे २.३७ लाखांवर पोहोचली असून, यापैकी ४१.०३ टक्क्यांहून अधिक प्रवासी आता डिजिटल माध्यमातून तिकीट घेत आहेत. हा टप्पा महानगरपालिका परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, आयुक्त डॉ. विपीन, परिवहन व्यवस्थापक आणि मनपा परिवहन विभागाच्या संपूर्ण चमूच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. पंतप्रधानांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेतून प्रेरित प्रणाली अंतर्गत रोख व्यवहार कमी झाल्याने भाडे वसूली व महसूल व्यवस्थापनात पारदर्शकता येते, गळती थांबते आणि प्रवाशांचे बसमध्ये चढणेही जलद होते. व्यापक दृष्टीने पाहता, प्रत्येक डिजिटल व्यवहार देशाची औपचारिक अर्थव्यवस्था बळकट करतो. "हे यश नागपूरकर जनतेचे आहे," असे परिवहन समितीचे सभापती मंगला खेकरे म्हणाले. "डिजिटल पेमेंटचा स्वीकार करून नागपूर, महाराष्ट्र आणि भारताची मान अभिमानाने उंचावणाऱ्या प्रत्येक नागपूरकराचे आणि 'आपली बस'च्या प्रत्येक प्रवाशाचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. 'आपली बस' अधिक सोयीस्कर, विश्वासार्ह आणि पूर्णतः डिजिटल करण्यासाठी आमचे प्रयत्न अविरत सुरू राहतील." स्थानिक, राज्य व केंद्र स्तरावरील सर्व उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने पाठबळ देणाऱ्या महापौर निता ठाकरे आणि स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, तसेच वरिष्ठ नेतृत्वाने मनपावर सोपविलेले प्रत्येक ध्येय पूर्णत्वास नेण्यासाठी मोलाचे योगदान देणारे मनपातील सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांचे सभापतींनी विशेष आभार मानले.

## बल्लारपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी रविंद्र भंडारवार यांची वाशिम येथे सहायक आयुक्तपदी नियुक्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर (धनंजय पांढरे)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या समाज कल्याण व तत्सम गट-अ संवगार्तील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने २२ सप्टेंबर २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात बल्लारपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी रविंद्र भंडारवार यांना वाशिम येथे सहायक आयुक्त, समाज कल्याण पदावर नियुक्ती आदेश देण्यात आला.



मंत्रालयाच्या परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून विविध गट-अ पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना यावेळी नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

रविंद्र भंडारवार यांनी बल्लारपूर नगर परिषदेत उपमुख्याधिकारी म्हणून कार्यरत असताना प्रशासकीय कामकाज, नागरी सुविधा तसेच शाळा सुधार योजना आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत योगदान दिले. आता त्यांची वाशिम येथे सहायक आयुक्त, समाज कल्याण या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झाल्याने बल्लारपूर नगर परिषदेसह शहरातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून झालेल्या निवडीमुळे भंडारवार यांच्या प्रशासकीय कारकिदीर्ला नवी जबाबदारी मिळाली असून, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे. २२ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता मंत्रालयाच्या विस्तारित इमारतीतील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात हा गौरव सोहळा पार पडला. नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर रविंद्र भंडारवार यांचे सहकारी, मित्रपरिवार आणि बल्लारपूर शहरातील नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पावसाने दडी मारली, पिके करपली, हेक्टरी ५० हजारांची तातडीने मदत द्या!

### सलील देशमुख यांची मागणी, काटोल-नरखेडमधील नुकसानग्रस्त शेतीची बांधावर जाऊन पाहणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

काटोल-नरखेड तालुक्यात पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप पिकांसह संत्रा व मोसंबीच्या फळबागांवर गंभीर संकट ओढवले आहे. पाण्याअभावी सोयाबीन, कापूस व तूर पिके करपली असून संत्रा-मोसंबीच्या बागांमध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोणताही गाजावाजा न करता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली.



यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पिकांचे नुकसान, पाण्याची उपलब्धता आणि आगामी रब्बी हंगामातील अडचणी जाणून घेतल्या. काटोल-नरखेड हा महत्त्वाचा फलोत्पादन पट्टा असून पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे या भागातील विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. तलाव व इतर जलसाठ्यांमध्येही पाणीसाठा कमी झाला आहे. त्यामुळे फळबागांसह खरीप पिकांना पाण्याचा मोठा ताण सहन करावा लागत आहे.

पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून काही भागांत उभी पिके करपल्याचे चित्र आहे. त्यातच विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे. संत्रा व मोसंबीच्या बागांमध्ये फळगळ वाढल्याने बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

सलील देशमुख म्हणाले, पावसाची दडी आणि रोगांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे बळीराजा पूर्णपणे संकटात सापडला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी अडचणीत आहे. शासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन पंचनाम्यांच्या प्रक्रियेत वेळ न घालवता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. ही मदत किमान तीन हेक्टरच्या मयार्देपर्यंत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी.

दरम्यान, पावसाचा खंड कायम राहिल्यास आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील जलस्रोत आटत चालल्याने नागरिकांसह जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे. भूजल पातळी घटल्याने आगामी रब्बी हंगामातील पिके कशी घ्यायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करून दिलासा द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा सलील देशमुख यांनी दिला.

या पाहणी दौऱ्यात पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नुकसानग्रस्त शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**थोडक्यात**

## चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व समाज मेळावा २७ सप्टेंबरला

### केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी यांच्या सौजन्याने ४०० गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या सौजन्याने त्यांच्या मातोश्री स्व. श्रीमती भानुताई गडकरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ





मागील १७ वर्षांपासून चर्मकार सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येत आहे. यंदाही इयत्ता दहावी व बारावीमध्ये ६५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या नागपूर शहर व ग्रामीण भागातील सुमारे ४०० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. हा भव्य सत्कार व समाज मेळावा रविवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता. शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात, महाल, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी १,५०० रुपये प्रोत्साहनपर बक्षीस, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार असून, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासह आमदार प्रवीण दटके, मोहन मते, नरेंद्र भोंडेकर, डॉ. परिणय फुके, महापौर निताताई ठाकरे, माजी आमदार संदीप जोशी, अनिल सोले, डॉ. उपेंद्र कोठेकर, दयाशंकर तिवारी, सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष सतीश डागोर, उपमहापौर सौ. लिलाताई हाथीबेड, नगरसेवक व शहर महामंत्री रितेश गावंडे, योगेश पाचपोर, भैय्यासाहेब बिघाणे, श्रीराम मांडस्कर व डॉ. राजेंद्र चौधरी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नागपूर शहर व ग्रामीण जिल्ह्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच समाज बांधव- भगिनींनी या सामाजिक व शैक्षणिक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चर्मकार सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## चाचेर येथे अंगणवाडीत लोकप्रतिनिधी दिवस



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

सोमवार (ता. २१ सप्टेंबर) ला ग्रां. प. चाचेर अंतर्गत अंगणवाडी क्र. ४ मध्ये 'लोकप्रतिनिधी दिवस' साजरा करण्यात आला. हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान राजमाता जिजाऊ यांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष योगराज घोरपडे माजी ग्रामपंचायत सदस्य, शैलेश कोपरकर सदस्य ग्रां. प. चाचेर, सुरेंद्र टेंबरे ग्रां. प. सदस्य, वनश्री टेंभरे माजी सदस्य ग्रामपंचायत, आयुर्वेदिक डॉक्टर मेश्राम, अंगणवाडी सेविका बीसणे, नगरे, श्रोते, बावनकुळे, हुमणे तसेच गावातील महिला व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अंगणवाडी परिसरामध्ये एक पेड माँ के नाम या संकल्पनेतून आंब्याचे झाड लावण्यात आले.

## तांडा येथे सेवा संकल्प अभियान अंतर्गत आशीर्वादाचा दिवा प्रेरणादायी कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी स यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत 'आशीवार्दाचा दिवा' हा प्रेरणादायी कार्यक्रम तांडा येथे माजी उपसरपंच ग्रा.पं. तांडा चंद्रशेखर जाधव यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पार्टी शाखा तांडा च्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी चंद्रशेखर जाधव अध्यक्ष भाजपा अ.जा.मौदा तालुका, श्रीगंगाधर डोरले अध्यक्ष तंटामुक्त समिती तांडा, श्री शंकर भूरे अध्यक्ष भाजपा तांडा, राहुल डोरले, जनार्धन गिरीपुंजे, मधुकर डोरले, दिनेश थोटे, सचिन किनेकर,वैभव डोरले, रामू येळणे, ओमप्रकाश वरखडे, गणेश कोहडे, फुलचंद गेडाम, रविंद्र पाठक, रमेश गेड़ाम व तांडा येथील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## जंगल मेडो रिसॉर्ट संचालकाची आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

जगप्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोलारा परिसरात जंगल मेडो रिसॉर्टचे संचालक आणि वन्यजीव छायाचित्रण



क्षेत्रातील परिचित चेहरा कुणाल जयंत पटेल (४२, रा. नवसारी, गुजरात) यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी समोर आली. या घटनेने ताडोबाच्या पर्यटन क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून, त्यांच्या परिचितांमध्ये आणि स्थानिक व्यावसायिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. कुणाल पटेल हे गेल्या सुमारे १५ वर्षांपासून कोलारा परिसराशी जोडले गेले होते. जंगल मेडो रिसॉर्टच्या माध्यमातून त्यांनी ताडोबा पर्यटन क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. वन्यजीव, विशेषतः ताडोबातील वाघ आणि निसर्ग यांचे छायाचित्रण करण्यात त्यांना विशेष रस होता. त्यामुळे पर्यटक, वन्यजीवप्रेमी आणि छायाचित्रकारांमध्येही ते परिचित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्त



# चिटणीस पार्कमध्ये १२ श्रीगणेश मूर्ती स्वीकार केंद्राचे लोकार्पण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देत गणेशभक्तांना श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी सुलभ व सुविधाजनक व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके यांच्या संकल्पनेतून चिटणीस पार्क येथे १२ गणेश मूर्ती स्वीकार केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्रांचे विधिवत पूजन करून महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते बुधवार (ता. २३) रोजी लोकार्पण करण्यात आले.

यावेळी गांधीबाग झोन सभापती उमा देशमुख, नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत, नगरसेवक सचिन नाईक, नगरसेवक संजय बालपांडे, नगरसेविका वैशाली उदापूरकर, नगरसेविका विद्या कन्हेरे, नगरसेविका प्रमिला गौर, ग्रीन व्हिजीलचे संस्थापक कौत्सुव चॅटर्जी, कु. सुरभी जैस्वाल, पर्यावरण तज्ज्ञ स्वानंद सोनी तसेच मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी. महापौर निता ठाकरे यांनी श्रीगणरायांचे पूजन करून सर्व नागरिकांना सुख, व समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना केली. गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक पद्धतीने श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करावे तसेच मनपाने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम विसर्जन कुंडांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

नागपूर महानगरपालिकेतर्फे यावर्षी शहरातील दहाही झोनमध्ये विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांना आपल्या घराजवळील कृत्रिम विसर्जन कुंडाची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी मनपाच्या माध्यमातून क्युआर कोड व संकेतस्थळावर झोननिहाय कृत्रिम विसर्जन कुंडांची माहिती, ठिकाणे व दिशादर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिकांनी क्युआर कोड किंवा संकेतस्थळाचा उपयोग करून आपल्या जवळच्या कृत्रिम विसर्जन कुंडात श्रीगणेश मूर्तीचे पर्यावरणपूरक व श्रद्धापूर्वक विसर्जन करावे, असे आवाहन करण्यात आले.

चिटणीस पार्क येथे स्व.प्रभाकरराव दटके यांच्या स्मृतीनिमित्त आमदार श्री. प्रवीण दटके यांच्या पुढाकारातून १२ विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व कुंडांना प्रमुख नद्यांची नावे देण्यात आली आहेत. यामध्ये ८ कुंड २० फूट लांब व १२ फूट रुंद, ५ कुंड १५ फूट लांब व ९ फूट रुंद, तर २ कुंड १२ फूट लांब व ८ फूट रुंद आहेत.

गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी अधिक वेळ प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी विविध आकारांची १२ कुंडे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच विसर्जनाच्या वेळी भक्तिगीते वाजविण्यात येणार असून, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळीही गणेशभक्तांना कोणतीही अडचण होऊ नये यासाठी विद्युत व्यवस्था व रोषणाई करण्यात आली आहे.

या विसर्जन कुंडांची रचना स्वस्तिकाच्या आकारात करण्यात आली असून, विसर्जनानंतर निर्माल्याचे स्वतंत्रपणे संकलन व्हावे यासाठी प्रत्येक ठिकाणी निर्माल्य कलशाची व्यवस्था करण्यात आली आहे. चिटणीस पार्कच्या सर्व प्रवेशद्वारांतून गणेशभक्तांना मूर्ती घेऊन येण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे संचालन महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा महानगर पालिकेच्यावतीने मानाचा दुपट्टा व छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

**गणेश मूर्ती स्वीकार केंद्राची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१. चिटणीस पार्कच्या सर्व प्रवेशद्वारांतून गणेशभक्तांना मूर्ती आणता येणार.
२. विविध आकारांची १२ विसर्जन कुंडे उपलब्ध असल्याने प्रतीक्षा वेळ कमी होणार.
३. विसर्जनाच्या वेळी भक्तिगीते वाजविण्यात येणार असल्याने भक्तीमय वातावरणाची निर्मिती.
४. रात्रीच्या वेळीही पुरेशी रोषणाई व विद्युत व्यवस्था.
५. स्वस्तिकाच्या आकारातील विसर्जन कुंडांची आकर्षक रचना.
६. निर्माल्य संकलनासाठी विसर्जनस्थळी स्वतंत्र निर्माल्य कलशांची व्यवस्था.

थोडक्यात

## नागपूरच्या रोहिणी रामटेकेची इस्तंबूलमध्ये सुवर्ण कामगिरी

### Women's Equipped Bench Press Championship २०२६ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व, ४० लिफ्टर्सच्या स्पर्धेत सुवर्णपदक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या पॉवरलिफ्टर रोहिणी रामटेकेंनी तुर्कियेतील इस्तंबूल येथे झालेल्या Women's Equipped Bench Press Championship -2026 या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. विविध देशांतील सुमारे ४० लिफ्टर्स सहभागी असलेल्या या स्पर्धेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत गेल्या तीन वर्षांपासून त्या नियमित पॉवरलिफ्टिंगचा सराव करीत आहेत. नागपुरातील G99 Gym अँन्ड स्पोर्ट अकँडमी तसेच पुणे येथे त्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. प्रशिक्षक ज्योती भादेकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. रोहिणी यांनी आपल्या यशाचे श्रेय आई पुष्पमाला पाटील, पती सुहास रामटेकें व मुलगा चैतन्य रामटेकेंच्या पाठिंब्याला दिले. तसेच प्रशिक्षक ज्योती भादेकर, आर्यन म्हस्के, गिरीश बिंजाडे आणि संपूर्ण टीमचे आभार मानले. या आंतरराष्ट्रीय यशासाठी Good Earth AgroChem Pvt. Ltd. (GoodEarth Group) यांच्या Sports CSR Programme अंतर्गत मिळालेल्या प्रायोजकत्वाचेही महत्त्वपूर्ण योगदान राहिले. कौटुंबिक जबाबदाऱ्या, नोकरी आणि क्रीडा यांचा समतोल साधत मिळविलेले रोहिणी यांचे हे यश नागपूरसह महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

## तिनखेड्यात आयुर्वेदाचा जागर, ११० रुग्णांची आरोग्य तपासणी मूळव्याध शिबिरात ३० रुग्णांचे निदान, ७ जणांना पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी जीवनशैलीचा मार्ग असल्याचा संदेश देत आयुष्यमान आरोग्य मंदिर (आयुष) तिनखेडा येथे २३ सप्टेंबर रोजी जागतिक आयुर्वेद दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भगवान धन्वंतरी यांच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानिमित्त आयोजित आरोग्य तपासणी व मूळव्याध उपचार शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जागतिक आरोग्य दिन व सेवा संकल्प अभियानाच्या संयुक्त उपक्रमांतर्गत आयोजित शिबिरात तब्बल ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ३० रुग्णांना मूळव्याधीचे निदान झाले. त्यापैकी ७ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा देण्यात आली, तर इतर रुग्णांना आवश्यक उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना आजाराचे निदान वेळेत व्हावे आणि उपचारासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे, हा शिबिराचा प्रमुख उद्देश होता. याशिवाय शिबिरात उपस्थित रुग्णांची रक्तदाब व मधुमेह तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान गुदरोगाच्या कर्करोगाचा एक संशयित रुग्ण आढळून आला. संबंधित रुग्णाला पुढील तपासणीसाठी आवश्यक संदर्भ सेवा व मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित झाले. यावेळी डॉ. अभिजीत पाचपोर व डॉ. उमेश देशमुख यांनी आयुर्वेदाचे महत्त्व, मूळव्याधीची कारणे व लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, योग्य आहार-विहार, दिनचर्या व ऋतुचर्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मूळव्याधीवरील उपचारामध्ये क्षारसूत्र चिकित्सेची भूमिका याविषयीही उपस्थितांना विशेष माहिती देण्यात आली. आजार बळावण्यापूर्वी त्याची लक्षणे ओळखून वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आयुर्वेदाच्या माध्यमातून आजारांवर उपचार करण्याबरोबरच रोगप्रतिकारक क्षमता, संतुलित आहार आणि शिस्तबद्ध जीवनशैली यावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित नागरिकांना आयुर्वेदाबाबत शपथ देऊन आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नितीन लेंडे यांनी भूषविले. यावेळी सरपंच बेबीताई हिवराळे, उपसरपंच प्रीतमभाऊ नासरे तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सविता गजभिये यांनी सूत्रसंचालन केले, तर निलेश राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रभूदास वानखडे, घोरसे, शोभा चाफले, शालू गोरे, कविता ढोणे, वंदना घोरपडे, हिम्मत वंजारी, नितेश रेवतकर, रोशनी गायकवाड तसेच अंगणवाडी सेविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. आरोग्य तपासणीसोबतच आयुर्वेद व प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक माहिती मिळाल्याने नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

## एस. टी. महामंडळाची पार्सल सेवा ठप्प

**जिंतूर :** एस. टी. महामंडळाचे कोट्यावधीचे देयके थकीत असल्याने कंत्राटदार हेनेकस कंपनीचे कंत्राट महामंडळाने रद्द केल्याने गेल्या ३ महिन्यांपासून पार्सल सेवा ठप्प झाली आहे. यामुळे व्यापाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असून महामंडळाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. दुसरीकडे या पार्सल व्यवसायावर उदरनिर्वाह चालविणाऱ्या अनेकांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. एस. टी. महामंडळाचे संपूर्ण महाराष्ट्रातील ३ वषार्चे पार्सल वाहतुकीचे कंत्राट १ डिसेंबर २०२४ ते ३० डिसेंबर २०२७ पर्यंत महामंडळाने हेनेकस कंपनी पुणे यांना दिले होते.

## काटोल-नरखेडमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांचा तहसीलवर पाच तास ठिय्या

### पीकविमा, फळगळ भरपाई, सरसकट कर्जमाफीसह सहा मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे आंदोलन





**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

अपुऱ्या पावसामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. काटोल व नरखेड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, खरीप २०२५ चा रखडलेला पीकविमा तातडीने द्यावा, संत्रा-मोसंबी बागांमधील फळगळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटना, नागपूरच्या वतीने बुधवारी, २३ सप्टेंबर रोजी काटोल तहसील कार्यालयात आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांनी तब्बल पाच तास तहसील कार्यालयात ठिय्या देत प्रशासनाचे लक्ष वेधले.

सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयात निवेदन देऊन आंदोलनाला सुरुवात झाली. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काटोल व नरखेड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

खरीप २०२५ च्या पीकविम्याची रक्कम अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही. सर्व निकष पूर्ण असतानाही तांत्रिक कारणे दाखवून विमा नाकारण्यात आल्याचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला. संबंधित प्रकरणांची फेरतपासणी करून पात्र शेतकऱ्यांना पीकविमा तातडीने अदा करावा, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांनी शेताभोवती कुंपण केले असतानाही रानडुक्कर व नीलगायींकडून पिकांचे नुकसान सुरूच आहे. त्यामुळे शासकीय जंगलाला सात फूट उंचीचे मजबूत तार कुंपण करून वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली.

संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या बागांमध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ झाली आहे. त्यामुळे संबंधित बागांची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून भरपाई द्यावी, अशी मागणीही आंदोलनातून करण्यात आली. पाण्याची पातळी खोल गेल्याने अनेक ठिकाणी सौरपंपातून पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे नियमित कृषी वीजपंप कनेक्शन देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली.

कर्जमाफीच्या प्रक्रियेत केवायसी न होणे, मयत खातेदारांच्या प्रकरणात दिरंगाई, फार्मर आयडी तसेच वाटणीपत्रामुळे नावे वगळली जाणे अशा विविध त्रुटींमुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. या सर्व त्रुटी दूर करून सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी संघटनेने केली. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा. मागण्यांची दखल न घेतल्यास यापुढे अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेतकरीपुत्र सागर दुधाने यांनी दिला.

आंदोलनात सागर दुधाने यांच्यासह बाबा शेळके, बाळू जोध, प्रेम नारायण वैद्य, वसंत चांडक, गणेश्वर बंदी, अजय लाडसे, हर्षल जाने, नकुल लोहे, दिनेश मुरडिया, विजय कानडे, योगेश भादे, अराध्य खडसे तसेच काटोल-नरखेड तालुक्यातील अनेक शेतकरी सहभागी झाले.

## 'वनहक्क आमचा अधिकार-वनसंवर्धन आमची जबाबदारी' शाश्वत विकास हीच दिशा

### सेवा संकल्प अभियानांतर्गत एकदिवसीय कार्यशाळा, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणीकरिता कार्यशाळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

ग्रामसभांचे सशक्तीकरण, वनसंवर्धन आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी या कार्यशाळेचे एक दिवसीय आयोजन सोमवारला तहसिल कार्यालय येथे संपन्न झाले. या वेळी ग्रामस्थकार्यशाळेला मार्गदर्शन करताना अधिकार यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. यावेळी विविध विभागांचे अधिकारी , पदाधिकारी उपस्थित होते. वनहक्क कायद्याची माहिती व जनजागृती ग्रामसभांचे सशक्तीकरण व सामुहिक वनहक्कांचे संवर्धन निर्णित हक्कांबाबत अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण. शासकीय विभागांमधील समन्वय व कन्व्हर्जन्स मजबूत करणे.

ग्रामसभांच्या माध्यमातून शाश्वत विकासाला चालना,कार्यशाळेत वनविभाग, महसूल विभाग, पंचायत विभाग आणि इतर शासकीय यंत्रणांचे अधिकारी तसेच सामुहिक वनहक्क क्षेत्रातील कामांचे प्रकार व मयार्दा, कोअर व बफर क्षेत्र नियोजन व अनुमती प्रक्रिया, रोजगार हमी योजनेंतर्गत कामे व अंदाजपत्रक, ग्रामसभांच्या पोर्टलवरील नोंदणी व मंजुरी प्रक्रिया, तसेच निधीचा वापर, लेखापरीक्षण व पारदर्शकता अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ मधील तरतुदींनुसार पारशिवनी तालुक्यातील अनेक गावांना सामुहिक वनहक्कांचे दावे मंजूर करण्यात आले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तहसील कार्यालय आणि वनविभाग यांच्या सहकार्याने सेवा संकल्प अभियानांतर्गत हे एकदिवसीय कार्यशाळा तहसील कार्यालय, पारशिवनी येथे संपन्न झाली. यावेळी नायब तहसीलदार, पारशिवनी,विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी राहुल काकडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांनी सांगितले. विषयतज्ञ अनुप जामोदकर यांच्यासह पारशिवनी तालुक्यातील सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी सहभाग घेतला. ग्रुप ऑफ ग्रामसभा पारशिवनी निलेश उईके सचिव मनराज इनवाते, अध्यक्ष सामायिक वन हक्क व्यवस्थापन समिती नरहर ढवलापूर नरहर घाटकोकडा पेंच कुकडा कोलीत मारा, अंबाझरी, सिलादेवी, सुवरधरा येथील सर्व अध्यक्ष सचिव उपस्थित होते.

# प्रहार मिलिटरी स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलींच्या हँडबॉल संघाचे दिमाखदार यश

### जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम क्रमांक, सर्व खेळाडूंची विभागीय स्तरासाठी निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी संचालित प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगर, नागपूर येथील १७ वर्षांखालील मुलींच्या हँडबॉल संघाने जिल्हा क्रीडा संघटनेच्या हँडबॉल अजिंक्यपद स्पर्धेत दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपदाचा मान मिळविला. यशवंत स्टेडियम, धंतोली, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रहार मिलिटरी स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, आत्मविश्वास, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. स्पर्धेदरम्यान प्रहार मिलिटरी स्कूलच्या मुलींनी आक्रमक खेळा सोबतच बचावाचेही उत्कृष्ट प्रदर्शन केले.

प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी परस्परांमध्ये उत्तम समन्वय राखत संघभावनेचे दर्शन घडविले. निर्णायक क्षणी दाखविलेली चिकाटी आणि आत्मविश्वास यामुळे संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे विजेत्या संघातील सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामागे संघाचे प्रशिक्षक ओमप्रकाश शहू यांचे मार्गदर्शन, नियोजनबद्ध प्रशिक्षण तसेच खेळाडूंची मेहनत आणि सातत्यपूर्ण सराव यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. नियमित सराव, शारीरिक तंदुरुस्ती, तांत्रिक कौशल्य आणि सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळ करण्यावर देण्यात आलेल्या भरामुळे संघाला हे यश मिळाले.

**चार खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड**

प्रहार मिलिटरी स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे. शाळेतील नक्ष वैद्य, सार्थक खडसकर, हार्दिक परिहार आणि तितीक्षा माहुरे या चार खेळाडूंची राज्यस्तरीय हँडबॉल स्पधेर्साठी निवड झाली आहे. त्यामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला आणि खेळाडूंच्या मेहनतीला आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. विजेत्या संघात अन्वी पुंडे, प्रज्ञा मडावी, श्रेया भैसारे, रसिका तेलसमारे, तितीक्षा माहुरे, ऋतुजा डोरले, शिक्षा गोहरे, लावण्या मेश्राम, मनस्वीनी हरडे, निर्मयी सहारे, तेजस्विनी भगत, तमन्ना शेंदरे, आरुषी माहुरे, आर्या चांभारे आणि रिद्धी सातपुते यांचा समावेश आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या प्राचार्या सौ. वंदना कुलकर्णी तसेच शिक्षकवृंद उपस्थीत होते.



प्रफुल्ल देशमुख अँन्ड कंपनीत गणरायाचा भक्तिमय उत्सव



आदर्श बनकर, दसरा रोड, महाल, नागपूर यांच्या घरी विराजमान बाप्पा



नवस्फुर्ती गणेशोत्सव मंडळ, मानेवाडा रोड



काव्यांश बागल, गोविंद नगर, नरसाळा



'दिव्याचा महागणपती-२०२६' आणि आम्ही सातजणी ग्रुप



न्यु स्वराज नगर गणेश उत्सव मंडळ, बेसा-पिपळा रोड, नागपूर

## दैनिक सिंहवाणी वृत्तचा 'आरती संग्रह घरोघरी'




दक्षिण नागपुरातील मानेवाडा रोड येथील कल्पना ज्वेलर्सचे संचालक अमित खुबाळकर यांना ग्राहकांना वितरणासाठी 'आरती संग्रह पुस्तिका भेट देण्यात आल्या. यावेळी त्यांच्या प्रतिष्ठानातील सहकारीवर्गाची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# बाप्पांच्या पर्यावरणपूरक निरोपासाठी नागपूर महानगरपालिकेची जय्यत तयारी

### महापौर निता ठाकरे यांनी केली व्यवस्थेची पाहणी, शहरात ४४७ कृत्रिम विसर्जन कुंड,

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** मागील दहा ते बारा दिवसांपासून प्रत्येकाच्या मनात घर करणाऱ्या गणरायाचे अनंत चतुर्दशीला गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या..! च्या गजरात निरोप घेणार आहेत. महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात उपमहापौर लिला हाथीबेड,



स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, विरोधीपक्ष नेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ.विपीन, वैद्यकीय आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे यांच्यासह इतर सर्व झोन सभापती, अधिकारी व कर्मचारी यांच्या नेतृत्वात बाप्पांच्या पर्यावरणपूरक निरोपासाठी मनपाने जय्यत तयारी केली आहे.

नागपूर शहरात यंदाचा गणेशोत्सव अतिशय उत्साहात आणि पूर्णपणे पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने व्यापक व सर्वसमावेशक तयारी करण्यात आली आहे. शहराच्या जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाला हातभार लावण्यासाठी मनपातर्फे शहरात विविध ठिकाणी तब्बल २२५ ठिकाणी एकूण ४४७ कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे. नवव्या दिवसीय श्रीगणेश मूर्तींचे विसर्जनासाठी मनपाद्वारे ४९ ठिकाणी तयार करण्यात आलेल्या १३७ कृत्रिम तलावांमध्ये २ हजार २८६ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. विशेष म्हणजे, यात २ हजार १२४ मातीच्या व १६२ पीओपीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. शहरात आगमन झालेल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन सुलभ व पर्यावरणाला हानी न पोहोचवता व्हावे, यासाठी मनपाने चोख व्यवस्था केली आहे. यात मोठ्या आकाराच्या गणेशाच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी, कच्छीविसा आणि कोराडी येथील विशेष मोठे तलाव सज्ज आहेत.

## समाजोपयोगी योजनांचा लाभ वंचितांपर्यंत पोहोचविणाऱ्या मिलिंद आळणे यांना 'राज्यस्तरीय प्रबुद्ध समाजरत्न पुरस्कार'



**दै. सिंहवाणी वृत्त, वसमत :** प्रबुद्ध टेंपल चॅरिटेबल ट्रस्ट नांदेड यांच्याकडून संजय खाडे मुख्य संपादक प्रबुद्ध परिवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक गुरुगोविंद सिंग पत्रकारिता महाविद्यालय संचालक विकास कदम नगरसेविका अनुपमा गायकवाड मॅडम, मिलिंद व्यवहारे, हाटकर साहेब साहित्यिक, कवी या मान्यवराच्या हस्ते मिलिंद आळणे यांना राज्य स्तरीय प्रबुद्ध समाज रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या माध्यमातून समतादूत म्हणून कार्यरत असलेले मिलिंद वामनराव आळणे यांनी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना विद्यार्थी, महिला, शेतकरी व वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय प्रबुद्ध समाज रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. मिलिदआळणे यांनी बार्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक योजना व विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळवून देण्यासाठी काम केले. प्रतीक्षा वाघमारे या विद्यार्थिनीला रशियामध्ये एमबीबीएस शिक्षणासाठी जाण्यासाठी मार्गदर्शन मिळवून देण्यासह अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यात त्यांनी सहभाग घेतला.

हिंगोली येथे IBPS क्लासेस, वसमत येथील विद्यार्थिनी व महिलांसाठी रइकप्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत Tally प्रशिक्षण, तसेच बार्टीच्या माध्यमातून टढरउ मार्गदर्शन वर्ग यांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी स्पर्धात्मक परीक्षांचे आयोजन करून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव ही करण्यात आला होता. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, जात पडताळणी, शेतकऱ्यांसाठी विहीर योजना आदी योजनांची माहिती व लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त विविध जनजागृती उपक्रम, वृक्षारोपण आणि ज्ञानवर्धक स्पर्धांचे आयोजन करण्यात त्यांचा सहभाग राहिला आहे. स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून जवळपास ४० ते ५० गावांमध्ये शासकीय योजनांची माहिती व लाभ पोहोचविण्यासाठी ते कार्यरत आहेत. त्यांच्या विविध सामाजिक उपक्रमांची विविध वृत्तपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर दखल घेण्यात आली आहे.

आळणे यांना यापूर्वी राजर्षी शाहू महाराज प्रेरणा पुरस्कार, विश्वरत्न सन्मान, सावित्री-ज्योती सन्मान पुरस्कार, राष्ट्रीय प्रतिभा गौरव पुरस्कार, इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड, प्राइड ऑफ इंडिया अवॉर्ड, विश्वरत्न पुरस्कार, युवा महाराष्ट्र आदर्श समाज रत्न भूषण, महाराष्ट्र समाज भूषण गौरव पुरस्कार, राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार आणि आदर्श समाजसेवक पुरस्कार यांसह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# न्यायालयाच्या आदेशानंतरही शासनाला जाग कधी येणार? बालगृह कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न अद्याप प्रलंबित

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीची उच्चस्तरीय बैठक घेण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील विनाअनुदानित स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालगृहांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न न्यायालयापर्यंत पोहोचूनही अद्याप धोरणात्मक तोडगा निघालेला नसल्याने कर्मचारी आणि संस्था चालकांमध्ये प्रतीक्षा कायम आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ७ मे २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात राज्य शासनाला पात्र बालगृहांना वेतन अनुदान देण्यासंदर्भात सहा महिन्यांच्या आत धोरण तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाने आपल्या निर्णयात बालगृहांमध्ये सुशिक्षित, प्रशिक्षित आणि अनुभवी मनुष्यबळाची आवश्यकता अधोरेखित केली. कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन मिळाले नाही तर बालगृहांचे प्रशासन आणि तेथील बालकांना मिळणाऱ्या सेवा प्रभावित होऊ शकतात, असेही न्यायालयाने नमूद केले आहे.

**चार महिने उलटले, आता निर्णय कधी?**

७ मेच्या आदेशानंतर आता चार महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. न्यायालयाने शासनाला सहा महिन्यांची मुदत दिलेली असल्याने उर्वरित कालावधीत शासन कोणती ठोस कार्यवाही करणार, याकडे राज्यातील बालगृह कर्मचारी आणि संस्था चालकांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे न्यायालयीन प्रकरणात राज्य शासनाने बालगृहांना प्रति बालक दरमहा २,००० इतके बिगर-वेतन अनुदान दिले जात असल्याची भूमिका मांडली होती. त्यापैकी १,५०० बालकांच्या देखभालीसाठी आणि ५०० प्रशासकीय खर्चासह कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी असल्याचे शासनाचे म्हणणे होते. न्यायालयाने मात्र बालकांच्या संगोपनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व अधोरेखित करत शासनाच्या घटनात्मक जबाबदाऱ्यांकडे लक्ष वेधले.

**मुख्यमंत्र्यांनी आता थेट हस्तक्षेप करावा**

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला व बालविकास विभाग, वित्त विभाग आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने संयुक्त उच्चस्तरीय बैठक बोलावून न्यायालयीन निर्देशांच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा, अशी मागणी पुढे येत आहे. बैठकीत पात्र बालगृहांची निश्चिती, मंजूर पदांचा आकृतिबंध, कर्मचाऱ्यांचे वेतनमान, वेतन अनुदानासाठी आवश्यक आर्थिक तरतूद आणि धोरण लागू करण्याची निश्चित तारीख याबाबत स्पष्ट निर्णय होणे अपेक्षित आहे.

**शासनासमोर पाच थेट प्रश्न**

न्यायालयाने सहा महिन्यांची मुदत दिल्यानंतर आतापर्यंत नेमकी कोणती कार्यवाही झाली? धोरणाचा मसुदा तयार झाला आहे का? वित्त विभागाकडे प्रस्ताव गेला आहे का? पात्र बालगृह व कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेतन अनुदानाचे धोरण प्रत्यक्षात कधी लागू होणार?

बालगृहातील कर्मचारी हे काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संगोपन, शिक्षण, समुपदेशन, आरोग्य, पुनर्वसन आणि दैनंदिन देखरेखीच्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ कर्मचाऱ्यांच्या वेतनापुरता मर्यादित नसून बालगृहांतील बालकांना मिळणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेशीही जोडलेला असल्याचे न्यायालयाच्या निर्णयातून स्पष्ट होते.

**आता लक्ष ७ नोव्हेंबरपूर्वीच्या शासन निर्णयाकडे**

७ मे २०२६च्या न्यायालयीन आदेशातील सहा महिन्यांची मुदत लक्षात घेतल्यास ७ नोव्हेंबर २०२६पर्यंत धोरण तयार करण्याचा निर्देश आहे. त्यामुळे शासनाने शेवटच्या क्षणाची वाट न पाहता तातडीने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी बालगृह क्षेत्रातून मागणी होत आहे.

**बालकांची सेवा करणाऱ्यांना न्याय कधी?**

न्यायालयाचा आदेश : ७ मे २०२६, धोरणासाठी दिलेली मुदत : ६ महिन, मुदत पूर्ण होण्याची तारीख : ७ नोव्हेंबर २०२६, आता मागणी मुख्यमंत्र्यांनी तातडीची बैठक घेऊन धोरण निश्चित करावे.

थोडक्यात

## राष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर लेबर युनियनद्वारे मजुरांचा सन्मान

### मुधोजी भोसले यांच्या हस्ते १०० सायकल व १०० शिलाई मशीनचे करण्यात आले वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर लेबर युनियन द्वारे विश्वकर्मा जयंतीचे औचित्य साधून मजुरांना १०० सायकली आणि १०० शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. पवार विद्यार्थी भवन येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गोवा आणि इतर राज्यांमधून मजूर व ठेकेदार बंधू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. असंगठीत कामगारांच्या कल्याणासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या राष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर लेबर युनियन तर्फे घेण्यात आलेल्या या मदत साहित्य वाटप कार्यक्रमामुळे अनेक गरजूंना मदतीचा हात मिळाला. या कार्यक्रमात नागपूरचे राजे मुधोजी भोसले महाराज तथा दिपक निलावार मुख्य अतिथी म्हणून सहभागी झाले होते. असंगठीत कामगार हे देशाच्या विकासात मोठ्या प्रमाणावर योगदान असून सुद्धा ते नेहमी दुर्लक्षित असल्याची खंत राजे मुधोजी भोसले यांनी आपल्या भाषणात बोलून दाखवली. दीपक निलावार यांनी मजुरांच्या विकासासाठी लोकांनी समोर येण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात युनियनचे अध्यक्ष विजय पटले यांनी मजुरांच्या विविध विषयांवर प्रकाश टाकला तसेच गेल्या ४ वर्षात १ मजुरांच्या १५०० केसेस मध्ये मजुरांना न्याय दिल्याची माहिती दिली. याप्रसंगी मजुर व ठेकेदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## संरक्षण कायदेविषयक मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

भिमरावबापू आदर्श विद्यालय, केळवद येथे "बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा २०१२ (पॉक्सो कायदा), नागरिकांची मूलभूत कर्तव्ये तसेच समाजातील महिलांची सुरक्षा आणि गोपनीयता" या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. शेकडोंच्या संख्येत उपस्थित विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना पी.पी. ठाकुर, दुसरे सह. दिवाणी न्यायधीश वरिष्ठ स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, सावनेर, यांनी बालकांचे लैंगिक गुन्हयांपासुन संरक्षण कायदा २०१२ याबाबत तसेच यु. आर. पवार, अधिवक्ता, सावनेर, यांनी समाजातील महिलांची सुरक्षा आणि गोपनीयता याबाबत आणि जि. के. बर्डे, अधिवक्ता, सावनेर, यांनी नागरिकांचे मुलभुत कर्तव्य आणि अधिकार याबाबत सखोल आणि तपशीलवार माहीती उपस्थितांना करुन दिली. एम. जे. मोहोड, अध्यक्ष, तालुका विधी सेवा समीती तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सावनेर यांनी आपल्या अध्यक्षीय उदबोधना व्दारे उपस्थितांना सांगितले की प्रत्येक शांळामधे संविधान हा विषय शिकविण्यात यावा. तसेच भारताच्या संविधानात दिलेल्या उद्देशिकेचे तत्व संवार्नी आत्मसात करुन त्यानुसार जिवन जगण्याचा प्रयत्न करावा.

या वेळी कार्यक्रमास शैलेश पी. जैन, अध्यक्ष, तालुका वकील संघ, सावनेर, पी. बी. मुंढे, विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समीती, सावनेर, कळंबे सर, प्राचार्य भिमरावबापु देशमुख हायस्कुल, केळवद आणि चौधरी सर, प्राचार्य भिकुलाल चांडक स्कुल, केळवद हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चालखेर सर, सह शिक्षक, भिमरावबापु देशमुख हायस्कुल, केळवद आणि आभार प्रदर्शन ए. वाय. निंबाळकर, सचिव, तालुका वकील संघ, सावनेर यांनी केले. सर्व न्यायालयीन कर्मचारीवृंद आणि तालुका बार असोसियेशन, सावनेर तसेच पंचायत समीती, सावनेर यांच्या सहकायार्मुळे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यात आला.

# सिमेंट रस्त्यांऐवजी जलसंधारणाला प्राधान्य !

- अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय बैठकीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश
- पीक पंचनाम्यांसाठी प्रमाणित कार्यपद्धती, कृषी आधारित कामांवर भर
- विजेचे योग्य नियोजन करा, आंदोलकांशी संवेदनशीलतेने प्रतिसाद द्या

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समित्यांनी निधीचे वाटप करताना सिमेंट रस्ते आणि गटारींच्या कामांना फाटा देऊन पिण्याचे पाणी व जलसंधारणाच्या कामांवर भर द्यावा, असे स्पष्ट निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी मंत्रालयात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासमवेत आज राज्यातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्याची बैठक घेतली. अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव व विविध विभागांच्या सचिवांसह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

सिमेंट रस्त्यांऐवजी 'शिवकालीन बंधारे' आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे महसूलमंत्र्यांनी सुचवले. प्रत्येक जिल्ह्यातील मृत झालेले व जुने साठवण बंधारे तातडीने जिवंत करावेत आणि पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे पुनर्भरण करावे, असे ठरविण्यात आले. यासोबतच रोजगार हमी योजना (ईजीएस) आणि कृषी आधारित कामांवर भर देण्याचे प्रशासनाला सांगण्यात आले आहे.

**प्रत्यक्षात बांधावर जाऊन पीक पंचनामे करा**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पीक पंचनाम्यांबाबत अत्यंत कडक आणि स्पष्ट सूचना दिल्या. पंचनामे करताना ग्रामसेवक, कृषी सहाय्यक आणि तलाठी या तिघांनीही सोबत असले पाहिजे. केवळ डिजिटलच नव्हे, तर प्रत्यक्षात बांधावर जाऊनही सर्व्हेक्षण झाले पाहिजे. शेतकऱ्यांना त्यांचे नाव पंचनाम्यात आल्याचा दिलासा मिळाला पाहिजे. यासाठी पंचनाम्याची एक प्रमाणित कार्यपद्धती तयार करावी आणि केलेले पंचनामे तातडीने ग्रामसभेपुढे मांडून मंजूर करून घ्यावेत, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.

**वीज नियोजनासाठी महावितरणसोबत बैठका**

राज्यात सध्या विजेच्या मागणीत वाढ झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी



जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन विजेचे योग्य नियोजन करावे, असे निर्देश देऊन बावनकुळे म्हणाले की, अंगणवाड्यांना तातडीने वीज कनेक्शन द्यावे आणि अभियंत्यांनी प्रत्यक्ष ग्राऊंडवर उपस्थित राहावे.

**आंदोलकांशी संवाद साधा**

दुष्काळी परिस्थितीत लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे दुष्काळी भागात नागरिकांनी पाण्यासाठी किंवा इतर प्रश्नांसाठी मोर्चे काढल्यास, अधिकाऱ्यांनी त्यांचे निवेदन स्वतः स्वीकारावे आणि चचेर्तून तातडीने मार्ग काढावा, अशी संवेदनशीलता बावनकुळे यांनी प्रशासनाकडून अपेक्षित केली आहे.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी राज्यातील पावसाची आणि धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती मांडली. धरणांमध्ये पाणीसाठा फार कमी नसला तरी तो मुबलकही नाही. पावसाअभावी पिकांवर मोठा परिणाम होणार असून, येत्या दोन-तीन दिवसांत परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. त्यामुळे प्रशासनाने आता दुष्काळ आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन यावर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी डिजिटल क्रॉप सर्व्हे अपलोड करण्याच्या सूचना दिल्या, तर ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पंचनाम्यांची 'एसओपी' आणि ग्रामसभेच्या मंजुरीला दुजोरा दिला. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना आणि नवीन प्रकल्पांबाबत आपली मते व्यक्त केली.

## दगडी चाळीचा सूत्रधार कुख्यात सूरज कावळेसह अन्य दोन आरोपींवर गुन्हा दाखल

### प्लॉटवर अतिक्रमण करून पानठेला लावणे भोवले, खापरखेडा पोलिसानी केला पानठेला जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

दगडी चाळीचा सूत्रधार सूरज कावळे व अन्य दोन साथीदारांनी एका प्लॉटवर बेकायदेशीर ताबा मिळवून पानठेला सुरू केला होता तक्रार दाखल होताच खापरखेडा पोलिसांनी प्लाटवरील अतिक्रमण काढून पानठेला जप्त केला आहे. याप्रकरणी दगडी चाळीचा मोहरक्या कुख्यात सूरज कावळे, शुभम उर्फ गेरू उईके व शुभम कावळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार मेहमूद खान यांच्या मालकीच्या जागेवर आरोपी सूरज कावळे, शुभम उईके, शुभम कावळे यांनी अतिक्रमण करून पानठेला सुरू केला होता सदर पानठेल्यावर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुन्हेगारांचा वावर होता त्यामूळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. यासंदर्भात खापरखेडा पोलीस ठाण्यात दोन महिन्यांपूर्वी तक्रार दाखल करण्यात आली होती. शेवटी खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळ गाठून प्लॉटवर अतिक्रमण करून सुरू केलेला अवैध पानठेला जप्त केला करून बीएनएस ३२९ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी सूरज कावळे व शुभम उर्फ शेरू तडीपार आरोपी असून मुख्य बाजारपेठ गँगवार प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहे नुकतीच त्यांच्यावर ममोका अंतर्गत कार्यवाही करण्यात आली असून २ ऑगस्टपासून फरार आहेत.

सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास करंगामी, पोलीस शिपाई शेखर वानखेडे यांनी पार पाडली.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली नुकसानग्रस्त पिकांची पाहणी

**परभणी** : जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी आज बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची स्थिती आणि अडचणींची आस्थेवाईकपणे चौकशी करत धीर दिला.

जिल्हाधिकारी चव्हाण यांनी परभणी तालुक्यातील ताडपांगरी, गंगाखेड तालुक्यातील महातपुरी, माखणी, सिरसम शे., डोंगरजवळा या गावांना भेट देऊन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी पीक परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शासन आपल्या पाठीशी असून परिस्थितीचा गांभीयार्ने आढावा घेतला जात आहे. शासनाच्या सूचनेप्रमाणे पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी अहवाल शासनाकडे तात्काळ सादर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## रामपुरी फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

### केळवद पोलिसांकडून तपास सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, केळवद**

केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील रामपुरी फाटा परिसरात आज, २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजताच्या सुमारास एका वृद्ध व्यक्तीचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली.

घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना मिळताच त्यांनी तत्काळ केळवद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर यांना माहिती दिली. त्यानंतर केळवद पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

जखमी अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीस उपचारासाठी सावनेर शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. मृत व्यक्तीची ओळख तुकाराम नथ्थुजी मोरांडे (वय ६०), रा. देशमुख कॉलनी, केळवद, ता. सावनेर, जि. नागपूर अशी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक हे शेतातून पायी आपल्या घरी परतत होते. या घटनेत नेमक्या कोणत्या वाहनाची धडक बसली, याचा शोध केळवद पोलीस घेत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी सुरू असून, अपघात नेमका कसा घडला याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मृतक हे घटनास्थळी किमान अर्धा तासापासून पडून असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने मृतदेह शवविच्छेदनासाठी सावनेर शासकीय रुग्णालयात रवाना करण्यात आला. या प्रकरणी पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.

## विदर्भ चेस्ट असोसिएशनतर्फे 'जागतिक फुफ्फुस दिना'निमित्त वॉकेथॉन आणि मोफत पीएफटी तपासणी शिबिरांचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त,नागपूर**

२५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या जागतिक फुफ्फुस दिनाचे औचित्य साधून विदर्भ चेस्ट असोसिएशनतर्फे श्वसन आरोग्य आणि आजार प्रतिबंधाविषयी जनजागृती मोहीम राबवली जात आहे. या वर्षीची जागतिक थीम 'ए लाइफटाइम ऑफ लंग हेल्थ' (आयुष्यभर फुफ्फुसांचे आरोग्य) ही आहे.

**श्वसन आरोग्य समजून घ्या**

आपली फुफ्फुसे शरीराला ऑक्सिजन पुरवण्याचे अखंड काम करतात. मात्र वाढते प्रदूषण, धूम्रपान आणि संसगार्मुळे दमा, सीओपीडी, निमोनिया, टीबी आणि पल्मोनरी फायब्रोसिस यांसारख्या आजारांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. यामुळे सततचा खोकला, श्वास घेण्यास त्रास होणे आणि थकवा यांसारख्या समस्या निर्माण होतात, ज्याचा दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होतो.

फुफ्फुसांचे कायमस्वरूपी नुकसान टाळण्यासाठी वेळेवर पल्मोनोलॉजिस्ट (फुफ्फुस विकार तज्ज्ञ) यांचा सल्ला घेणे आणि PFT (पल्मोनरी फंक्शन टेस्ट) व ब्रॉन्कोस्कोपीसारख्या तपासण्या करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक फुफ्फुस दिन हा केवळ जनजागृतीचा उपक्रम नसून, आपले श्वसन आरोग्य आयुष्यभरासाठी प्राधान्य क्रमावर ठेवण्याची आठवण करून देणारा दिवस आहे, असे विदर्भ चेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश स्वर्णकार यांनी सांगितले.

**वॉकेथॉन आणि निरोगी फुफ्फुसांचे ५ स्तंभ**

VCA चे अध्यक्ष डॉ. राजेश स्वर्णकार आणि मानद सचिव डॉ. नैनेश पटेल यांच्या नेतृत्वाखाली असोसिएशनतर्फे जनजागृती वॉकेथॉन आणि विविध क्लिनिक्समध्ये मोफत PFT तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

**ही मोहीम निरोगी फुफ्फुसांच्या ५ स्तंभांवर आधारित आहे:**

लंग फंक्शन टेस्ट (फुफ्फुसांची क्षमता तपासणी): नियमित PFT आणि स्पायरोमेट्रीद्वारे आजारांचे लवकर निदान. **धूम्रपान त्याग:** फुफ्फुसांची कार्यक्षमता टिकवण्यासाठी तंबाखूचे सेवन पूर्णपणे बंद करणे. **हवा प्रदूषणाविषयी जागरूकता:** घरातील आणि बाहेरील प्रदूषणापासून बचाव करणे. **अद्ययावत निदान पद्धती:** अचूक उपचारांसाठी ब्रॉन्कोस्कोपीचे महत्त्व समजून घेणे. **प्रौढ लसीकरण** : वेळेवर लसीकरण करून फुफ्फुसांच्या गंभीर संसर्गापासून संरक्षण करणे.

FIRS द्वारे जागतिक स्तरावर राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेत सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. VCA नागपूरच्या सर्व नागरिकांना या वॉकेथॉन आणि मोफत तपासणी शिबिरांमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण देत आहे.

### कार्यक्रम तपशील

- १. वॉकेथॉन

दिनांक: २७ सप्टेंबर २०२६
वेळ: सकाळी ७:०० वाजता
स्थळ: वॉकर्स स्ट्रीट, सिव्हिल लाइन्स, नागपूर

२. मोफत PFT आणि स्पायरोमेट्री तपासणी शिबिर

शुक्रवार, २५ सप्टेंबर
सकाळी ९:०० - दुपारी १:००
डॉ. आदित्य परिहार
ESIS रुग्णालय, सोमवारी पेठ

- शुक्रवार, २५ सप्टेंबर

सकाळी १०:०० - दुपारी १२:००
डॉ. समीर लोटे
पनासिया क्लिनिक, धंतोली
सकाळी १०:०० - दुपारी १२:००
डॉ. अभिषेक फा, एफ ए चेस्ट क्लिनिक, धंतोली
दुपारी २:०० - सायंकाळी ६:००
डॉ. सागर गांधी, लंगपॉइंट, धंतोली
सायंकाळी ६:०० - रात्री ९:००
डॉ. सुशांत मुळे, दांडे हॉस्पिटल, गोकुळपेठ

- शनिवार, २६ सप्टेंबर

सकाळी १०:०० - दुपारी १२:००
डॉ. समीर अरबत, वन हेल्थकेअर, रामदासपेठ
दुपारी ३:०० - सायंकाळी ६:००
डॉ. नैनेश पटेल, सेंट्रल इंडिया चेस्ट सेंटर, काँग्रेस नगर

- रविवार, २७ सप्टेंबर

सकाळी १०:०० - दुपारी १:००
डॉ. विक्रम राठी, राठी चेस्ट क्लिनिक, सक्करदरा

- सोमवार, २८ सप्टेंबर

सायंकाळी ६:०० - रात्री ९:००
डॉ. अविनाश गंधारे, गंधारे चेस्ट अँड डायग्नोस्टिक्स, नंदनवन

- बुधवार, ३० सप्टेंबर

सकाळी १०:०० - दुपारी १२:००
डॉ. राजेश स्वर्णकार आणि डॉ. संकेत अग्रवाल
गेटवेल रुग्णालय, धंतोली

## सावनेर नगरपरिषदेत मतदार यादीच्या तांत्रिक विसंगती व नो-मॅपिंग सुनावणीस प्रारंभ




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर नगरपरिषद कार्यक्षेत्रातील मतदार याद्यांच्या अचूकतेसाठी व पुनरीक्षणासाठी 'एस.आय. आर.' प्रक्रियेअंतर्गत विशेष सुनावणीचा कार्यक्रम आज, दिनांक २३ सप्टेंबर २०२६ पासून सावनेर नगरपरिषद कार्यालयात सुरू करण्यात आला आहे.

प्रारूप (ड्राफ्ट) मतदार यादीमध्ये तांत्रिक विसंगती अथवा 'नो-मॅपिंग'मुळे नगरपरिषद हद्दीतील एकूण १,६५७ मतदारांची नावे समाविष्ट होऊ शकलेली नाहीत. अशा सर्व मतदारांसाठी ही सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. एकाही पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क डावलला जाऊ नये आणि सर्व तांत्रिक त्रुटी वेळेत दूर व्हाव्यात, हा या सुनावणीमागचा मुख्य उद्देश आहे.

मतदार नोंदणीच्या या अत्यंत महत्त्वपूर्ण व अंतिम टप्प्यात सर्व संबंधित मतदारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून यादीतील त्रुटींचे निराकरण करून घ्यावे. तसेच, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या किंवा अद्याप नोंदणी न झालेल्या नवीन पात्र नागरिकांनीही तात्काळ आपली मतदार नोंदणी करून घ्यावी, अशी विशेष विनंती प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

सावनेर नगरपरिषद हद्दीतील संबंधित १,६५७ नागरिकांनी नगरपरिषदेत सुरू असलेल्या या सुनावणी प्रक्रियेचा तातडीने लाभ घ्यावा आणि आपल्या नोंदींमधील तांत्रिक विसंगती दूर करून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घ्यावे. त्याचप्रमाणे सर्व नवीन पात्र मतदारांनीही पुढाकार घेऊन आपली मतदार नोंदणी निश्चित करावी. अधिकाधिक नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट व्हावीत याकरिता नागरिकांनी प्रशासनास संपूर्ण सहकार्य करावे," असे जाहीर आवाहन सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सावनेर श्रीमती अर्शिया जुही यांनी केले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त



# वरोरा बाजार समितीच्या चार संचालकांना अपात्रतेची नोटीस, ३० सप्टेंबरला खुलासा सादर करण्याचे आदेश

## शेतकऱ्याची बाजारपेठ बनली राजकारणाचा आखाडा, किंग मेकर पुन्हा गेम पलटवणार?

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
**धर्मेंद्र शेरकुरे**

कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा येथील ग्रामपंचायत मतदारसंघातून निवडून आलेल्या चार संचालकांच्या पदाबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर कार्यालयाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम १५ अंतर्गत नोटीस बजावली आहे. संबंधित ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात आल्याने संचालकपदावर अपात्रता निर्माण झाल्याचा मुद्दा नोटिशीत उपस्थित करण्यात आला आहे.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने २१ सप्टेंबर २०२६ रोजी या नोटिसा जारी केल्या आहेत. त्यामध्ये डॉ. श्री विजय रामचंद्र देवतळे यांनी ७ सप्टेंबर २०२६ रोजी केलेल्या विनंती अजार्चा संदर्भ देण्यात आला आहे. संबंधित संचालक ग्रामपंचायत मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा येथे संचालक म्हणून निवडून आले असल्याचे नोटिशीत नमूद आहे.

नोटिशीनुसार, चारगाव खुर्द येथील राजू चिकटे, भटाळा हरीश जाधव, एकोना येथील गणेश चवले, आणि जामखुला येथील पुरुषोत्तम पावडे या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत सदस्यत्वाच्या आधारे बाजार समितीच्या ग्रामपंचायत मतदारसंघातून निवडून आलेल्या संचालकांच्या पात्रतेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम १३(२) नुसार बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्यांमधून चार सदस्य निवडून देण्याची तरतूद असल्याचेही नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर कलम १५ मधील तरतुदीनुसार संबंधित संचालकपद संपुष्टात आले असून पद रिक्त का घोषित करू नये, याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे.

संबंधित संचालकांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत कागदोपत्री पुराव्यासह स्वयंस्पष्ट खुलासा ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून सादर करावा, असे नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे.

निर्धारित दिवशी खुलासा किंवा म्हणणे सादर न केल्यास अथवा सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिला आहे. या प्रकरणामुळे वरोरा कृषि उत्पन्न बाजार समितीतील ग्रामपंचायत मतदारसंघातील संचालकांच्या पदाबाबत आता ३० सप्टेंबरच्या सुनावणीकडे लक्ष लागले आहे. बाजार समितीचे राजकारण पुन्हा एकदा अलग वळणावर असून पक्षातील किंगमेकर कोणती भूमिका घेणार व सभापती पद कोणाकडे वळणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

## सालेकसा पोलिसांची अवैध शस्त्राविरोधात कारवाई

### गांधीटोला येथे २४ वर्षीय तरुणाकडून लोखंडी गुप्ती जप्त, शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे व शस्त्रांविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान पोलिसांनी गांधीटोला येथे एका तरुणाकडून लोखंडी गुप्ती जप्त केली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सालेकसा पोलीस पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली. त्याआधारे गांधीटोला येथील रहिवासी सोहन सुकराम भांडारकर (वय २४) याच्या घराजवळ तपासणी करण्यात आली. यावेळी त्याच्याकडून लोखंडी धातूची गुप्ती, एकूण लांबी सुमारे ३९ सेंटीमीटर व मुठीची लांबी ८.५ सेंटीमीटर, अंदाजे १,२०० रुपये किमतीची आढळून आली. पोलिसांनी सदर शस्त्र जप्त केले.

या प्रकरणी सालेकसा पोलीस ठाण्यात अप. क्र. ४८८/२०२६, कलम ४, २५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये आरोपी सोहन भांडारकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र गवई करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक गोंदिया गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आमगाव नंदिनी चानपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवी नागोसे तसेच सालेकसा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

## भिलेवाड्यात २७ जनावरांना Gynarich इंजेक्शनचा पहिला डोस



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय, पंचायत समिती रामटेक अंतर्गत पशुचिकित्सालय कान्द्री यांच्या वतीने नियोजित प्रजनन व दूध उत्पादन सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत मौजा भिलेवाडा येथे एकूण २७ जनावरांना Gynarich इंजेक्शनचा पहिला डोस देण्यात आला. यामध्ये २५ गायी आणि २ म्हशींचा समावेश आहे. पशुपालकांच्या जनावरांमध्ये नियोजित प्रजननाला चालना देणे तसेच दूध उत्पादनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला तालुक्याचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजेश बळी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रीती वाळके, पशुधन विकास अधिकारी डॉ. विरेंद्र सोनकुसळे, पंचायत समिती रामटेकचे विस्तार अधिकारी निमदेव चव्हाण, श्रीमती तपस्या मेश्राम,नरुले,श्रीखंडे,शिशुपाल भोवते आणि किशोर सांगोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमामुळे पशुपालकांना नियोजित प्रजनन व दुग्ध उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन आणि पशुवैद्यकीय सुविधेचा लाभ मिळणार आहे.

## कु .जान्हवी चेपूरवार सन्मानित



**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर**

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जिद्द अभ्यासात सातत्य ठेवत येणाऱ्या आव्हानांवर मात करीत जान्हवी वसंत चेपूरवार हिचा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यवतमाळ येथे प्रवेश निश्चित झाल्याबद्दल गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने मंडळाचे अध्यक्ष गणेश धमार्ळे तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे ज्येष्ठ मार्गदर्शक रमेश सरागे,ग्रामगीताचार्य किसन गरडे, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर मंडळाचे सदस्य जितेंद्र किन्हेकर यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

श्रीरामपूर येथील प्रार्थनास्थळी प्रथम सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना किसन गरडे म्हणाले की राष्ट्रसंतांनी भाग्यापेक्षा प्रयत्नावर भर दिला आहे. त्याचे फळ जान्हवीला मिळाले अभ्यासात एकाग्रता सामुदायिक प्रार्थनेमुळे येते. जान्हवी गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यक्रमात नेहमी सहभागी असते आणि कार्यात सक्रिय असते यावेळी सरकारास उत्तर देतांना जान्हवी म्हणाली की, अपार मेहनत,चिकाटीने अभ्यास केल्यास गुरुदेव कृपा निश्चित होते तिने आपल्या यशाचे श्रेय आई संगीता चेपुरवार बहीण वैष्णवी साईनाथ हराळे मैत्रीण शर्वरी काळबांडे यांना देऊन असाच सर्वांचा आशीर्वाद व मार्गदर्शन मिळत राहो तसेच मान्यवरांच्या हस्ते सत्कार केल्याबद्दल आभार मानले. त्यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राष्ट्रीय कीर्तनकार प्रा.आकाश ताविडे महाराज अशोक भगत महाराज,अनिल अस्वार,यशवंत भगत,पुंडलिक भालेराव, श्यामराव देशमाने,सुरेश कदम,बाबासाहेब वाघमारे, गजानन गव्हाणकर, लक्ष्मण कदम, पंजाब गडदे, देवेश किन्हेकर, सुधाकर कपटे, किशोर राऊत, कैलास मस्के, साहेबराव सरकटे, संजय हटकर महिला प्रतिनिधी रंजना किन्हेकर, कमल गडदे, डॉ. देवश्री काळबांडे, स्मिता धर्माळे, मुक्ता काळबांडे, नेहा अडतकर, कस्तुरी धर्माळे उपस्थित होते.

## जगात गुरुपेक्षा कुणीच श्रेष्ठ नाही : डॉ.मधुसूदन घाणेकर

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे :** "माणूस कितीही मोठा झाला तरी तो माता,पिता आणि गुरुपेक्षा कधीच मोठा होऊ शकत नाही. कारण त्यांच्यात देवरुपच असते. त्यांच्या संस्कारांमुळेच आपले जीवन यशस्वी होत असते. म्हणून प्रत्येकाने मातृ देवो भव, पितृ देवो भव, गुरु देवो भव ही त्रिसुत्री व त्यांची शिकवण आचरणात आणून आपले जीवन सार्थकी लावावे." असे प्रतिपादन विश्वगुरु डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ताथवडे येथील मुख्याध्यापिका संगीता सूर्यवंशी यांना डॉ. मधुसूदन घाणेकर ब्रम्हध्यान विश्वपीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते नुकताच २०२६ चा आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार प्रदान करण्यात आला, याप्रसंगी डॉ. घाणेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाष समेळ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सदर शाळेचे नाव पूर्वी जीवन शिक्षण मंदिर असे होते , ही शाळा आता जिल्हा परिषदेशी जोडली गेली आहे. डॉ.मधुसूदन घाणेकर हे या शाळेचे माजी विद्यार्थी (१९६१-१९६४). डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या नावावर ३०९ विश्वविक्रम असून भारतासह २० देशात विश्वजोडो अभियान केले. डॉ. घाणेकर यांची जागतिक पातळीवर कीर्ति निर्माण झाली आहे.रेग्युलस ता-यास ' सर डॉ. मधुसूदन घाणेकर रेग्युलस तारा 'असे नाव दिले गेले आहे, अशा आपल्या शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी आपल्या शाळेचे,आपल्या गावाचे आणि देशाचे नाव मोठे केले.



ही गोष्ट नक्कीच आपल्या शाळेच्या दृष्टीने गौरवास्पद आहे !" असे गौरवोद्गार मुख्याध्यापिका संगीता सूर्यवंशी यांनी काढले आणि शाळेतर्फे डॉ. मधुसूदन घाणेकर यांचा जाहिर सत्कार केला. आपल्या यशात सर्व सहकारी शिक्षक आणि विद्यार्थी यांचा मुख्य वाटा आहे, असे आदर्श मुख्याध्यापिका पुरस्काराविषयी कृतज्ञता व्यक्त करताना संगीता सूर्यवंशी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. याच सोहळ्यात डॉ. घाणेकर यांनी शाळेतील आदर्श शिक्षक सचिन बेंडभर यांच्या सह शिवप्रसाद गुट्टे, कविता मोहिते,भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेराव ,प्रिती चव्हाण आदिंचे जाहिर सत्कार केले. तसेच गुणी मुलांना मिठुमिठु पोपट, लाफ इंटरनॅशनल पुरस्कारही डॉ. घाणेकर यांनी प्रदान केले. सोहळ्याचे औचित्य साधून डॉ. घाणेकर संपादित डहाळी अनितकालिकाच्या विश्वविक्रमी ११८८ वा विशेषांकही प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी 'सबकुछ'मधुसूदन या विश्वविक्रमी एकपात्री कार्यक्रमाचा ८५१९० वा प्रयोग सादर केला. यावेळी उपस्थित रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## विलास कारखान्याला राष्ट्रीय तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार

**नवी दिल्ली/लातूर :** विलास सहकारी साखर कारखाना लि. ला राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि., नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार दिमाखात प्रदान करण्यात आला. कारखान्याला मिळालेला हा एकूण ४० वा पुरस्कार असून, या ऐतिहासिक यशासह सहकार क्षेत्रात एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. त्यामुळे लातूरच्या सहकार क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी नवी दिल्लीत विंडसर पॅलेस येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र येथे आयोजित पुरस्कार सोहळा पार पडला.

## स्पिक मॅकेचा 'विरासत-हेरिटेज फेस्ट' आजपासून

### व्हीएनआयटीमध्ये तीन दिवसीय भव्य आयोजन





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताच्या समृद्ध शास्त्रीय कला व सांस्कृतिक परंपरेची ओळख युवा पिढीला करून देण्याच्या उद्देशाने स्पिक मॅके, सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व विश्वेश्वरया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'विरासत झ हेरिटेज फेस्ट' या तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे गुरुवार, २४ सप्टेंबरपासून आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस व्हीएनआयटीच्या सभागृहात चालणाऱ्या या महोत्सवात कार्यशाळा, मास्टरक्लास आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची विद्यार्थ्यांना मेजवानी मिळणार आहे. २४ ते २६ तारखेदरम्यान, ९ ते १२ व २ ते ५ वाजेदरम्यान दोन सत्रात लघुचित्रकला, कथ्थक आणि हिंदुस्थानी गायन या विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. डॉ. स्नेह गांगल लघुचित्रकला कार्यशाळा घेणार असून, जयपूर घराण्याचे नामवंत कथ्थक नर्तक आणि २००३ चे संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त पं. राजेंद्र गंगानी कथ्थक कार्यशाळेचे मार्गदर्शन करतील. पं. कुमार गंधर्व आणि विदुषी वसुंधरा कोमकली यांच्या कन्या व शिष्या विदुषी कलापिनी कोमकली हिंदुस्थानी गायन कार्यशाळा घेणार आहेत. त्यांना २०२३ मध्ये हिंदुस्थानी गायनासाठी संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

महोत्सवातील सायंकालीन संगीत मैफलींमध्ये सायंकाळी ६ वाजता व्हीएनआयटीच्या सभागृहात २४ सप्टेंबर रोजी पं. राजेंद्र गंगानी, २५ सप्टेंबर रोजी विदुषी कलापिनी कोमकली आणि २६ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध सतारवादक पं. कुशल दास यांचे सादरीकरण होणार आहे. व्हीएनआयटीचे संचालक प्रा. प्रेम लाल पटेल तसेच संस्थेचे अधिष्ठाता महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत. डॉ. अर्घ्य मित्र आणि डॉ. सारिका बहादूर व्हीएनआयटी हेरिटेज क्लबच्या विद्यार्थ्यांसह महोत्सवाचे समन्वयन करीत आहेत.

## भानेगावात आरोग्य तपासणीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### 'माझा गाव, आरोग्यसंपन्न गाव' भानेगावात आरोग्य तपासणीला गर्दी




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भानेगाव येथे भक्तीमय वातावरणासोबत आरोग्य जागृतीचा संदेश देण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोलीच्या अंतर्गत येणाऱ्या आयुष्यमान आरोग्य मंदिर, उपकेंद्र भानेगावच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रोगनिदान व आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिकांनी शिबिराचा लाभ घेत विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.

श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या ठिकाणी हे शिबिर घेण्यात आले. नागरिकांची रक्तदाब, रक्तातील साखर तसेच असंसर्गजन्य आजारांच्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळलेल्या आरोग्यविषयक तक्रारींबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले. गरज असलेल्या नागरिकांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.पावसाळ्यात वाढणाऱ्या जलजन्य तसेच कीटकजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य पथकाने विशेष जनजागृती केली. पिण्याचे पाणी स्वच्छ व सुरक्षित ठेवणे, घराभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे, साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावणे आणि डासांची उत्पत्ती होऊ न देणे याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली.

आजाराची लक्षणे जाणवल्यास स्वतःहून औषधोपचार न करता आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री पेटकर, डॉ. दीपक तरार व डॉ. अश्विनी शेरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पथकाने तपासणी शिबिराचे नियोजन केले. आरोग्य सहाय्यक धिरज टेकाळे, सीएचओ भाग्यश्री कुडमते, यशवंत घोटेकर, आरोग्य सेविका विणा वासनिक, आशा सेविका दुर्गा गोणेकर, लता बर्वे, संगिता तिडके, वैशाली शेंडे, अनिता शेंडे, शशीकला गजभिये, अंजु बागडे तसेच आरोग्य परिचर मनिषा ढोके यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

# प्रत्येक भारतीय सण पर्यावरण पद्धतीने साजरा झाला पाहिजे : प्राचार्य रवींद्र चन्ने

## राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशोत्सव उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**



राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे दिनांक २१ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव उत्साहात आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी माती तसेच विविध पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करून विविध आकारांच्या सुमारे ५० गणेशमूर्ती साकारल्या.

या उपक्रमात कवी कुलगुरू कालिदास शैक्षणिक महाविद्यालय, रामटेक येथील विद्यार्थी-शिक्षक आणि प्रशिक्षणार्थींनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती निर्मितीची कला तसेच पर्यावरणसंवर्धनाचे महत्त्व समजले.

स्पर्धेचे परीक्षण महाजन मॅडम, दलाल मॅडम, कु. श्रद्धा ठाकूर मॅडम आणि खागर मॅडम यांनी केले. उत्कृष्ट गणेशमूर्ती आणि कलाकृती साकारणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक भावेश आमदे, द्वितीय क्रमांक कु. प्रगती पाठक, तृतीय क्रमांक प्रणय सिंगाडे आणि चतुर्थ क्रमांक कु. सौम्या मेश्राम यांनी मिळविला. तसेच चित्रकला स्पर्धेत कु. इशिका येलूरे हिला पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेकचे प्राचार्य रवींद्र चन्ने आणि पर्यवेक्षक श्शैलेश परमार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी प्राचार्य रवींद्र चन्ने यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, प्रत्येक भारतीय सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा झाला पाहिजे. पर्यावरणसंवर्धनाची बीजे बालवयापासूनच विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य आपले विद्यालय करत आहे, ही अभिमानाची बाब आहे. त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमासाठी कवी कुलगुरू कालिदास शैक्षणिक महाविद्यालयाच्या प्रशिक्षणार्थी शिक्षिका कु. रुपाली मंगरुले, कु. धनश्री शरणागत आणि कु. खुशी घरजाळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिकांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कलात्मकता आणि पर्यावरणसंवर्धनाची जाणीव निर्माण झाली हे विशेष.